रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ ◆ अंक ३५४
www.ramprahar.com

शुक्रवार ११ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

खोपोलीच्या जंगलात भरकटलेल्या तरुणाची सुखरूप सुटका/२

'विकसित महाराष्ट्र २०४७ सर्वेक्षणात मत नोंदवावे'/५

मुरूडच्या दोन कराटेपटूंचे ब्लॅक बेल्ट परीक्षेत यश/८

## शहापूर घटनेप्रकरणी आरोपींची कोठडीत रवानगी



**ठाणे :** मासिक पाळी आली म्हणून शहापूरच्या दमाणी इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थिनींना विवस्त्र केल्याप्रकरणी पोलिसांच्या ताब्यात असलेल्या पाच आरोपींना कल्याण न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. शहापूर पोलिसांनी या प्रकरणात एकूण आठ जणांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केलेला आहे. त्यापैकी मुख्याध्यापिका, एक महिला कर्मचारी आणि शाळेतील तीन महिला शिक्षिका अशा पाच आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. संस्थाचालक, शिक्षिका आणि एक अन्य फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. मासिक पाळी तपासण्याच्या बहाण्याने विद्यार्थिनींना विवस्त्र करून त्यांचा छळ केल्याचा धक्कादायक प्रकार घडला होता. या घटनेबद्दल सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

# जनसुरक्षा विधेयक मंजूर

## राज्यात शहरी नक्षलवादाला बसणार चाप

**मुंबई : प्रतिनिधी**

शहरी नक्षलवाद आणि लोकशाहीविरोधी संघटनांचा बिमोड करण्यासाठी राज्य सरकारने आणलेले महाराष्ट्र जनसुरक्षा वियेधक गुरुवारी (दि. १०) विधानसभेत मंजूर करण्यात आले. १२,५०० सूचनांचा अभ्यास करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक विधानसभेत सादर केले. चर्चेनंतर आवाजी मतदानाने विधेयक मंजूर करण्यात आले.



याआधी जनसुरक्षा विधेयकावर विरोधकांनी आक्षेप घेतल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने तयार केलेला अहवाल ९ जुलै रोजी विधानसभेत पटलावर ठेवण्यात आला. त्यानंतर गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक विधानसभेत मांडले.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, विरोधकांनी सूचवलेले बदल आम्ही केले असून यावर आता सार्वमत झाले आहे. हे विधेयक राजकीय भूमिकेतून नाही, तर देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे सांगून लोकशाही न मानणाऱ्या संघटनांना संविधानावर आधारित राज्य उलथवून टाकायचे आहे. त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठीच हा कायदा आणला जात असून समतोल साधणारा कायदा आहे.

राज्यात नक्षलवादी विचारांचा प्रभाव असलेले चार जिल्हे होते. आता फक्त दोन तालुके उरले आहेत, तेदेखील संपतील, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

# न्हावाशेवा टप्पा क्र. ३ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करा

- आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांची मागणी
- प्राधिकरण स्तरावरून आवश्यक पाठपुरावा सुरू -मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील न्हावाशेवा टप्पा क्रमांक ३ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासंदर्भात तातडीने योग्य कार्यवाही करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे केली. या योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी मार्च २०२६पर्यंत भाववाढीशिवाय मुदतवाढ मंजूर करण्यात आली असून योजनेची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्तरावरून आवश्यक पाठपुरावा करण्यात येत आहे, असे लेखी उत्तर पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

न्हावाशेवा टप्पा क्र. ३ पाणीपुरवठा योजना काही तांत्रिक अडचणीमुळे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. या योजनेचा कार्यादेश डिसेंबर २०२०मध्ये देण्यात आला असून काम पूर्ण करण्याची मुदत ३० महिन्यांपर्यंत असताना




योजना कार्यान्वित न झाल्याने पनवेल महानगरपालिका क्षेत्रास पाणीटंचाईस सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे योजना तातडीने कार्यान्वित करून पनवेल महापालिका हद्दीतील पाणीटंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता.

या प्रश्नावर पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी उत्तरात सांगितले की, न्हावाशेवा टप्पा क्र. ३ पाणीपुरवठा योजना काही तांत्रिक अडचणीमुळे अपूर्ण असल्याची बाब खरी आहे. कोविड-१९ या साथरोगाचा प्रादुर्भाव, मशीनरी, मनुष्यबळ उपलब्धता व हालचालीवर आलेली बंधने, मर्यादा, निविदा कार्यादेशानंतर स्टील साहित्याच्या दरात झालेली असाधारण भाववाढ व त्यामुळे पाईपपुरवठा करण्यास कंत्राटदाराकडून झालेला विलंब, पळस्पे फाटा ते भोकरपाडादरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गलगतची अतिक्रमणे, लॉकडाऊनपर्यंतच्या कालावधीत भू-संपादनाच्या कार्यवाहीस झालेला विलंब, जागेचा मोबदला न मिळाल्याने जलवाहिन्या टाकण्यास संबंधित जागामालकांचा अडथळा व रेल्वे, एक्सप्रेस वे, टोल प्लाझा क्रॉसिंग आणि ओएनजीसी परिसरातून जलवाहिनी टाकण्यास ओएनजीसीने परवानगी नाकारणे अशा बाबींसोबत ठेकेदार मे. जी.व्ही. पी.आर. इंजिनिअर्स हैदराबाद यांच्याकडून नियोजनानुसार काम होत नसल्याने निदर्शनास आले असून संबंधित या ठेकेदारावर दंडात्मक कारवाई सुरू आहे. **(पान २ वर..)**

## पेण आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी सुरू -आरोग्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील वरवणे येथील आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यूप्रकरणी मुख्याध्यापक आणि वसतिगृह अधीक्षिकेला निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य राजकुमार बडोले, धर्मरावबाबा आत्राम, नाना पटोले यांनी प्रश्न-उत्तरांच्या तासात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला उत्तर देताना आरोग्यमंत्री आबिटकर बोलत होते.

राज्यात कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) हे अभियान राबविण्यात येत असून त्या अंतर्गत नियमित आरोग्य तपासणी व सर्वेक्षण केले जाते. याच सर्वेक्षणदरम्यान वरवणे येथील आश्रमशाळेतील कुमारी खुशबू ठाकरे या विद्यार्थिनीच्या डाव्या डोळ्याखाली चट्टा आढळून आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार तिच्यावर कुष्ठरोग प्रतिबंधक बहुविध औषधोपचार सुरू करण्यात आले होते. दुर्दैवाने उपचार सुरू असतानाच तिचा मृत्यू झाला. या प्रकरणाची चौकशी सुरू असून शवविच्छेदन अहवालानुसार टिशू ॲस्ट्रोपॅथोलॉजिकल तपासणी व रक्तनमुने केमिकल विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल. **(पान २ वर..)**

## आंबेनळी घाटात दरड कोसळून वाहतूक ठप्प

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावरील आंबेनळी घाटात गुरुवारी (दि. १०) मोठी दरड कोसळली. यामुळे घाटामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

दरड हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरु करण्यात आले असून यासाठी चार ते पाच दिवसांचा कालावधी लागणार असल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, पोलादपूर तहसीलदारांनी घाटमार्ग वाहतुकीसाठी पाच दिवसांसाठी बंद ठेवण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे. यामुळे या मार्गावरून महाबळेश्वर, पोलादपूर किंवा रायगड जिल्ह्याच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गणेशोत्सव महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून घोषित

**मुंबई : प्रतिनिधी**

१०० वर्षाहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून गुरुवारी (दि. १०) घोषित करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत ही घोषणा केली.



विधानसभेत निवेदन करताना मंत्री शेलार म्हणाले की, लोकमान्य टिळकांनी १८९३ साली सुरू केलेला हा उत्सव सामाजिक, राष्ट्रीय, स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि स्वभाषा या मूल्यांशी संबंधित आहे आणि आजही त्याच पद्धतीने साजरा केला जात आहे. महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असलेल्या या गणेशोत्सवासाठी महायुती सरकारने महत्त्वपूर्ण भूमिका घेतली आहे. या महोत्सवासाठी पोलीस सुरक्षा, आवश्यक पायाभूत सुविधांवरील खर्च आणि विशेषतः कसबा, पुणे, मुंबई तसेच संपूर्ण राज्यातील गणेशोत्सवासाठी लागणारा निधी राज्य सरकार खर्च करेल. गणेशोत्सव उत्साहाने साजरा करणे ही महायुती सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. **(पान २ वर..)**

## निवडक

### दिल्ली आणि एनसीआर परिसरात भूकंपाचे धक्के

**नवी दिल्ली :** दिल्ली आणि एनसीआर (राष्ट्रीय राजधानी क्षेत्र) परिसरात गुरुवारी (दि. १०) सकाळी ९.०४च्या सुमारास भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. ४.४ रिश्टर स्केलच्या या भूकंपाचा केंद्रबिंदू हरियाणातील रोहतक येथे होता. दरम्यान, गेल्या सहा महिन्यांत दिल्ली आणि एनसीआर परिसरामध्ये हा तिसरा भूकंप धक्का आहे. यापूर्वी १७ फेब्रुवारी आणि १९ एप्रिल रोजीही भूकंपाचे धक्के बसले होते. या भूकंपामुळे इमारती हादरल्याने घाबरलेले रहिवासी घराबाहेर मोकळ्या जागेकडे धावले.

### परमबीर सिंह यांना सीबीआयकडून क्लीन चिट

**मुंबई :** येथील माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना सीबीआयकडून क्लीन चिट मिळाली आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये सिंह आणि इतर पोलीस अधिकाऱ्यांवर पाच गुन्हे दाखल करण्यात आले होते. तक्रारीच्या अनुषंगाने तपासात तथ्य न आढळल्याने सीबीआयने न्यायालयात दोन्ही गुन्ह्यासंदर्भात क्लोजर रिपोर्ट दाखल केला. हा रिपोर्ट संबंधित न्यायालयाने स्वीकारला आहे.

## खालापूर इसांबेवाडीत अतिसाराची साथ

### लहान मुलाचा मृत्यू, १० जणांवर उपचार सुरू

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील इसांबे आदिवासीवाडीत अतिसाराची साथ पसरली असून सोहम तुकाराम वाघमारे या तीन वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. याशिवाय लागण झालेले जवळपास १० जण वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार घेत आहेत.

सावरोली-खारपाडा मार्गावर २८८ लोकसंख्येची इसांबेवाडी आहे. या वाडीत राहणाऱ्या सोहम वाघमारेला रविवारी उलट्या, जुलाब सुरू झाले. मुलाचे कुटुंब आसरेवाडी येथे वस्तीला गेले होते. तेथून रुग्णालयात जाण्यापूर्वीच सोहमचा मृत्यू झाला, तर इतर जवळपास सहा रुग्ण लोहप प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल आहेत. यामध्ये चार महिला व दोन पुरुषांचा समावेश आहे.



अतिसाराची साथ असल्याचे लक्षात आल्यानंतर आरोग्य यंत्रणेने इसांबेवाडीत तपासणी मोहीम सुरू केली आहे. अतिसाराची लागण झालेले दोन रुग्ण भिवपुरी येथील रुग्णालयात, तर दोन पेण येथील रुग्णालयात असल्याचे समजते.

दरम्यान, इसांबेवाडीची पेयजल योजना पाताळगंगा नदीवरून आहे. नदीतून थेट पाणी उचलले जात असून वाडीमध्ये खासगी विकसकाकडून जलशुद्धीकरण यंत्रणा बसवण्यात आली आहे. आरोग्य विभागाने जलशुद्धीकरण यंत्रणा साफसफाईच्या सूचना दिल्या असून पाण्याचे नमुने तपासणीकरिता पाठवले आहेत.

**लोहप प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेत असलेल्या सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. जे जे रुग्णालयात पाठवण्यात आलेल्या त्यांच्या नमुन्याचा अहवाल आल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात येईल. इसांबेवाडीतील जलशुद्धीकरण यंत्रणेचीदेखील पूर्णपणे तपासणी करण्यात येत असून पाण्याचे नमुने तपासणीकरिता पाठवले आहेत.**
**-डॉ. मंगेश देशमुख,**
**वैद्यकीय अधिकारी,**
**लोहप प्राथमिक आरोग्य केंद्र**

## खारघरमध्ये साकारणार अंतराळ संग्रहालय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने खारघर से. ३४मधील प्लॉट क्रमांक ८ येथे विज्ञान आणि अंतराळ अभ्यासावर आधारित एक भव्य अंतराळ संग्रहालय (स्पेस म्युझियम) उभारण्यात येणार आहे. यासाठी ४१.३४ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

**अशी आहेत वैशिष्ट्ये**

- विज्ञान व अंतराळविषयक एक्झिबिशन स्पेस
- १२० आसन क्षमतेचा विद्यार्थी बहुउद्देशीय हॉल
- २२० आसन क्षमतेचा मुख्य बहुउद्देशीय हॉल
- २ लिफ्ट आणि २ जिन्यांची सुविधा

भविष्यातील वैज्ञानिक पिढी घडवण्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व अंतराळ संशोधनाची रूची निर्माण होण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम असणार आहे तसेच सामान्य नागरिकांनाही अंतराळाची माहिती होण्यासाठी हे अंतराळ संग्रहालय उपयुक्त ठरणार आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. १०) झालेल्या सर्वसाधारण प्रशासकीय सभेने या प्रकल्पास मान्यता दिली. प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया होणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी दिली.






**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. स्वातंत्र्यपूर्व काळात २७ सप्टेंबर १९२५ रोजी केशव बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेल्या संघटनेला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त सुरू केलेल्या लेखमालेचा पहिला भाग गुरूपौर्णिमा गुरूवार, १० जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध झाला. आता दुसरा लेख येत्या रविवारी, १३ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध होईल.**

- मुख्य संपादक



# युवा धोरणातील सकारात्मक विचारधारेचा समावेश परिवर्तन घडवेल -मुख्यमंत्री

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

विकसित भारत २०४७ च्या दृष्टीने सुधारित युवा धोरणाची आखणी करावी. नव्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या युवकांच्या बदलत्या विचारसरणीचा समावेश युवा धोरणात केल्यास परिवर्तन शक्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. विधानभवन येथे राज्याच्या सुधारित युवा धोरणासाठी गठित समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा समितीचे अध्यक्ष दत्तात्रय भरणे, आमदार अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, संतोष दानवे, राजेश पवार, आशुतोष काळे, प्रवीण दटके, देवेंद्र कोठे, सुहास कांदे, डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रकाश सुर्वे, वरुण सरदेसाई, रोहित पाटील, युवा बिरादरीचे संस्थापक पद्मश्री क्रांती शाह, आयुक्त शीतल तेली तसेच राज्य व राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार विजेते उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, युवकांचे विचार, त्यांच्या अपेक्षा समजून घेत धोरण आखले गेले तर ते समर्पक ठरेल. शहरी व ग्रामीण भागातील युवकांना समान संधी मिळावी यासाठी प्रशिक्षण, सुविधा आणि योजनांचा समावेश असलेले समतोल धोरण तयार करणे आवश्यक आहे. युवक कल्याण विभागाबरोबरच अन्य विभागांनीही हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये, सोशल मीडिया आणि सेवा क्षेत्रातील प्रतिनिधींनाही धोरणात सहभागी करून त्यांच्या सूचना समाविष्ट करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी आज दिले. बैठकीत आमदार आणि निमंत्रित सदस्यांनीही सूचना मांडत समृद्ध धोरणासाठी योगदान दिले. शिक्षण, रोजगार, राष्ट्रप्रेमाला प्राधान्य यावेळी क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवित आहे. शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील युवकांच्या गरजा ओळखून, देश-विदेशातील युवकांबाबतच्या धोरणांचा अभ्यास करून, प्रत्यक्ष संवादातून उपाययोजना आखल्या जातील. नवे सुधारित युवा धोरण यामध्ये शिक्षण, रोजगार, उद्योजकता, बौद्धिक व सामाजिक विकास, स्टार्टअप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (-ख) याबरोबरच जबाबदारीची जाणीव, राष्ट्रप्रेम, नेतृत्वगुण रुजवणे यावर भर दिला जाणार आहे. यासाठी राज्य व जिल्हास्तरावरील योजना, युवा प्रशिक्षण केंद्र, युवा पुरस्कार, वसतीगृहे, महोत्सव, व्यक्तिमत्व विकास उपक्रम, युवा निधी आणि युवा प्रतिष्ठा निर्देशांक आदी बाबींचा समावेश केला जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# खोपोलीच्या जंगलात भरकटलेल्या तरुणाची अखेर सुखरूप सुटका

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई अंधरी येथील प्रियांशू गेडाम रिल बनविण्यासाठी कर्जत लोणावळा लोहमार्गावरील खोपोलीच्या झेनीथ धबधब्याच्या पासुन ४ किमी ऊंच डोंगरात व घनदाट जंगलात असणाऱ्या केपी वॉटरफॉल येथे एकटाच आला असता जंगलात भरकटला व रस्ता न सापडल्याने हतबलपणे बसला होता. पोलीसांना याची फोनवरून माहिती मिळताच खोपोलीतील यशवंती हायकर्सच्या पथकाने घटनास्थळी दाखल होत यशस्वी सुटका केली.



गुरुवारी १० जुलै रोजी दुपारी २ वा सुमारास अंधेरी (पूर्व), मुंबई येथील प्रियांशू गेडाम हा २० वर्षांचा तरुण खोपोली येथे एकटाच पर्यटनासाठी आला होता. खोपोली येथील सुप्रसिध्द के. पी. वॉटरफॉल येथे तो जाणार होता.तिथे जाण्यासाठीचा रस्ता खडतर आहे. खडी चढाई, डोंगर उतारावर वेगाने वाहणारे ओहोळ आणि निसरड्या पायवाटेने तिथे जावे लागते. नवख्या माणसाने एकट्याने चुकूनही तिथे जाण्याचे धाडस करु नये अशी परिस्थिती असतानाही प्रियांशूने जाण्याचे धाडस केले. मात्र ते धाडस त्याच्या अंगाशी येऊन तो रस्ता भरकटला.

एम. एम. आर. सी. ह्या मदत कक्षामध्ये समन्वयक राहुल मेश्राम यांना त्याने मदतीसाठी फोन केला . त्यांनी यशवंती हायकर्स च्या .पद्माकर गायकवाड सरांना फोन करून माहिती दिली आणि माहिती मिळताच तत्काळ प्रियांशू च्या सुटके साठी यशवंती चे पथक . पद्माकर गायकवाड सरांच्या मार्गदर्शनाखाली रवाना झाले. शोध पथक काही मिनिटांतच प्रियांशू पर्यंत पोहोचले आणि अत्यंत धोकादायक ठिकाणी अडकलेल्या प्रियांशूची सुखरूप सुटका करून त्याला खोपोली मध्ये घेऊन आले.

यशवंती हायकर्स खोपोली यांनी कमीतकमी वेळात हि शोध मोहीम फत्ते केली

# सिडकोतर्फे निवासी भूखंडांचे कब्जेहक्कामध्ये करता येणार रूपांतर

**नवी मुंबई : सिडको वृत्त**

सिडकोतर्फे रहिवासी प्रयोजनार्थ भाडेपट्ट्यावर (लिजहोल्ड) वाटप केलेल्या जमिनी कब्जेहक्कामध्ये (फ्रीहोल्ड) रुपांतरीत करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्देशानुसार प्रामुख्याने निवासी भूखंडांचे फ्रिहोल्डमध्ये रूपांतर करण्यासाठी येणाऱ्या अर्जांची छाननी करण्याकरिता सिडकोतर्फे समिती गठीत करण्यात आली आहे. ही योजना निविदा प्रक्रियेने, सिडकोमार्फत बांधण्यात आलेले गृहप्रकल्प तथा १२.५%/ व २२.५% योजनेंतर्गत वाटपित करण्यात आलेल्या निवासी भूखंडांकरीता लागू राहील. त्याअनुषंगाने सर्व निवासी मालमत्ता भूधारकांनी अर्ज केल्यावर निश्चित केलेले रुपांतर शुल्क भरल्यानंतर कब्जेहक्कामध्ये रुपांतरीत करता येईल.

ज्या भूखंडाच्या करारनाम्यामध्ये अनर्जित उत्पन्नाचा भरणा करण्याबाबत उल्लेख आहे, अशा भूखंडांना निश्चित केलेले रुपांतर शुल्कासह विहित अनर्जित रक्कमेचा भरणा करावा लागेल. अनुदानित / सवलतीच्या दराने वाटप केलेल्या भूखंडांचे निश्चित केलेल्या रुपांतर शुल्काव्यतिरिक्त इतर निश्चित केलेले शुल्क वसूल करुन कब्जेहक्कामध्ये रुपांतरीत करण्यात येईल.

ही योजना ऐच्छिक असून भाडेपट्टाविलेख (लिजडीड) झालेल्या भूखंडांनाच लागू राहील.

# तळा कृषी विभागाकडून शेती शाळेचे आयोजन

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील रोवळा येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण तृणधान्य उप अभियान अंतर्गत भात पीक शेती शाळेच्या तिसऱ्या वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्गामध्ये शेतीशाळेतील शेतकऱ्यांना भात लागवडीच्या विविध लागवड पद्धती विषयी मार्गदर्शन करण्यात आले तसेच या कार्यक्रमानंतर शेतीशाळा प्रात्यक्षिक प्लॉटमध्ये चार सूत्री पद्धतीने भात लागवड करण्यात आली



या मध्ये शेतीशाळेतील शेतकरी सुद्धा प्रत्यक्ष सहभागी होऊन चारसूत्री भात लागवडी पद्धतीने लागवड केली व लागवडीविषयी माहिती घेतली चारसूत्री पद्धतीमध्ये भाताचा पेंढा गिरिपुष्पाचा पाला हे सर्व टाकून प्रात्यक्षिक प्लॉट तयार करण्यात आलेला होता. पारंपरिक भात लावणीपेक्षा शेतकऱ्यांनी चारसूत्री भात लागवडीचे फायदे होत आहेत. या पद्धतीत कमी रोप लागतात, शिवाय खर्चही कमी येतो. मजूरवर्ग कमी लागतो आणि उत्पादन अधिक मिळते. त्यामुळे कृषी विभागाने तालुक्यामध्ये सुधारित भात लागवड तंत्रज्ञाना विषयी मोठ्याप्रमाणात जनजागृती केली आहे.

सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांच्या मदतीने या पद्धतीने लागवड करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त केले जात आहे. या लागवडीतून मजुरीच्या खर्चाची बचत होण्याबरोबर वेळही वाचला जात आहे व उत्पादनामध्ये सुद्धा वाढ होण्याची अपेक्षा आहे त्यामुळे ही पद्धत चांगली आहे,उप कृषी अधिकारी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.



**रोहा : राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष, पेट्रोलियम नॅचरल गॅस स्टँडिंग कमिटी चेअरमन खासदार सुनील तटकरे यांचा वाढदिवस त्यांच्या सुतारवाडी येथील निवासस्थानी साजरा करण्यात आला. या वेळी त्यांच्या मातोश्री, पत्नी वरदा तटकरे, कन्या राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.**

# अपभ्रंश करणाऱ्या पाट्या बदलण्याची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील मोहोपाडा हे महत्वाची बाजारपेठ असणारे ठिकाण आहे. गावाच्या मुख्य रस्त्यावर असलेल्या मोपाडा, मोहपाडा या पाट्या नावांचा अपभ्रंश करणाऱ्या असून अनेक वर्षापासून या पाट्या बदलल्या जात नसल्याने गावांच्या नावाचा उच्चार व लेखन चुकीच्या पद्धतीने केले जात आहे. यातच वासांबे असे कोणतेही गाव नसून मोहोपाडा गावाचीच वासांबे अशी पुर्वीपासून ओळख आहे. यावेळी परगावातून आलेले नागरिक वासांबे गाव शोधताना दिसतात.मोहोपाडा गावाच्या प्रवेशव्दार व थांब्याजवळ असणा-या गावाच्या नावांचे फलक हे चुकीच्या पद्धतीने लिहिलेले असल्याने अनेक वर्षापासून मोपाडा, मोहपाडा या गावाच्या नावाचा चुकीचा उच्चार व चुकीचे नामाभिधान केले जाते आहे. तरी ते मोहोपाडा (वासांबे) अशी प्रवेशव्दार, बसथांबा, रिक्षा थांबा येथे नावाच्या पाट्या लावाव्यात अशी मागणी गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे.

# स्व. चांगू काना ठाकूर यांच्या स्मृतिदिनानिमित्त सीकेटी महाविद्यालयात कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात स्व. चांगू काना ठाकूर यांचा पुण्यस्मरण दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा रविवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.



संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद महादेव करांदे आणि आमदार तथा कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रशांत ठाकूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमावेळी संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष वाय.टी. देशमुख, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, अनिल भगत, सचिव एस. टी. गडदे आदी मान्यवरांची उपस्थिती असेल.

प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. आर.डी. म्हात्रे, डॉ. एस.एन. पारकाळे, प्रा. डॉ. बी.डी. आघव आदींनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि संस्थापकांच्या स्मृतींचा सन्मान करणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.१०) विद्यार्थी कल्याण समिती व राष्ट्रीय सेवा योजना समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहाने व भक्तिभावाने साजरा करण्यात आली.



या कार्यक्रमाची सुरुवात, स्वर्गीय जनार्दन भगत साहेब, स्वर्गीय चांगू काना ठाकूर साहेब व स्वर्गीय माताजी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून, दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली प्रमुख पाहुणे म्हणून राजेश बेलानी उपाध्यक्ष प्रायव्हेट सेक्टर बँक इन इंडिया व सोनिया बेलानी समाजसेविका यांनी उपस्थित राहून गुरूंचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले तसेच त्यांनी आपल्या भाषणात गुरु म्हणजे केवळ शिक्षक नव्हे, तर जीवनाचे खरे मार्गदर्शक असे सांगत विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या वेळी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा समन्वयक विद्यार्थी कल्याण समिती तसेच राष्ट्रीय सेवा समितीचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले.

या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंना पुष्पगुच्छ, हस्तनिर्मित ग्रीटिंग्स आणि धन्यवाद पत्रे देऊन कृतज्ञता व्यक्त केली तसेच काही विद्यार्थ्यांनी गुरूंवरील कविता व त्यांनी त्यांचे विचार मांडले ज्यामुळे वातावरण भक्तिमय झाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुस्कान वालीलकर हिने केले व आभारप्रदर्शन युवराज देवरा याने केले. या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

पान १ वरुन

## न्हावाशेवा टप्पा क्र. ३ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करा

नवी मुंबई येथील विमानतळामुळे सभोवतालच्या परिसरामध्ये झालेल्या व होत असलेल्या विविध संस्था जसे की, राष्ट्रीय महामार्ग, एमएमआरडीए, एमएसआरडीसी यांच्यामार्फत सुरू असलेल्या रस्ते प्रकल्पामुळे योजनेतून टाकण्यात आलेल्या पाईपलाईनचे स्थलांतरण करणे अपरिहार्य होत आहे. पर्यायाने पूर्ण योजनेच्या भौतिक व आर्थिक गोष्टीवर बंधने येत असून कामास विलंब लागत आहे. सद्यःस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पनवेल महापालिका क्षेत्रास सद्यःस्थितीतील त्यांच्या मागणीनुसार पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी मार्च २०२६पर्यंत भाववाढीशिवाय मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. योजनेची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्तरावरून आवश्यक पाठपुरावा करण्यात येत असून सद्यःस्थितीत योजनेचे काम सुरू असून प्रगतिपथावर आहे, असेही मंत्री गुलाबराव पाटील यांनी उत्तरात नमूद केले आहे.

## पेण आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी सुरू -आरोग्यमंत्री

दरम्यान, आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्या स्तरावरदेखील या प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून संबंधित मुख्याध्यापक आणि महिला अधीक्षिका यांना अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी निलंबित केले आहे व त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू आहे तसेच मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना दोन लाख रुपयांचे सानुग्रह अनुदानदेखील देण्यात आले आहे. आदिवासी आश्रम शाळेत विद्यार्थिनींसाठी आरोग्यविषयक आवश्यक उपाययोजना करण्यासाठी आदिवासी विकास विभागाला सूचना देण्यात येतील, असेही सार्वजनिक आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सभागृहात सांगितले.

## गणेशोत्सव महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून घोषित

या निमित्ताने गणेशोत्सव मंडळांना आवाहन करताना मंत्री शेलार म्हणाले की, देखाव्यांमध्ये आपले सैन्य, सैनिक, सामाजिक उपक्रम, ऑपरेशन सिंदूर, देशांतर्गत विकासाची कामे आणि महापुरुष यांसारख्या गोष्टींचा विचार करावा. सामाजिक भान, पर्यावरणपूरक व उत्साहात साजरा होणारा गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून घोषित करताना आनंद होतोये, असेही त्यांनी सांगितले.

# सेवा फाउंडेशनने भरले माणगाव ओव्हरब्रीजखालील धोकादायक खड्डे

**माणगाव : बातमीदार**

निजामपूर रोडवरील माणगांव कडुन निजामपुरकडे जाताना ओव्हरब्रीजच्या खाली गेल्या अनेक दिवसांपासून मोठमोठे खड्डे पडले होते. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना व पादचाऱ्यांना मोठा त्रास होत होता. वाहतुकीचा वेग कमी होणे, धुळीचे प्रमाण वाढणे, पावसाचे पाणी साठत असल्याने खड्यांचा अंदाज न आल्याने अपघाताची शक्यता यामुळे नागरिक चिंतेत होते.



या पार्श्वभूमीवर सेवा फाऊंडेशन, माणगांव यांच्या वतीने समाजहिताची जबाबदारी स्वीकारत सदर खड्डे बुजविण्याचे कार्य मंगळवार दिनांक ८ जुलै आणि गुरुवार दिनांक १० जुलै रोजी करण्यात आले. या उपक्रमात निखिल कन्स्ट्रक्शन यांनी काँक्रिट स्वरूपात विशेष सहकार्य केले.

या कार्यात अमोल माने, मिलिंद शेलार, संजोग मानकर, नितीन शेलार, संतोष भोबड, सुरज कडू व आनंदिता कडू, रोहित दळवी, श्रीकांत जाधव, तेजस पवार, रोशन मोरे, शुभंकर वनारसे, इब्राहिम करेल, शैलेश गायकवाड यांनी सक्रीय सहभाग घेत श्रमदान केले.

# फसवणुकीचे चार गुन्हे उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

बॉलीवुड चित्रपट सारखे बंटी आणि बबलीला पनवेल शहर पोलीसांनी बेड्या ठोकल्या असून त्यांच्याकडून फसवणुकीचे चार गुन्हे उघडकीस आणले आहेत.

यातील आरोपी पियुष भोसले नावाच्या माणसाने तक्रारदार सुनिल बडगुजरजे व्यवसायिक सोनार आहे त्यांना स्वस्त दरात सोने देतो असे आमीष देऊन त्या बदल्यात रोखीने रुपये १०,००,००० रुपये महिला आरोपी मंदिपकौर हीला देण्यासाठी सांगुन तक्रारदार यांनी रक्कम दिल्यानंतर पियुष भोसले व त्याची सहकारी महिला दोन्ही आरोपी पसार झाले होते.

सुनील बडगुजर यांना त्यांची फसवणुक झाली हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणेत तक्रार दिल्यानंतर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितिन ठाकरे यांनी गुन्हे प्रकटीकरणचे अधिकारी पोउपनि विनोद लभडे यांना दिला.

पथकातील पोहवा परेश म्हात्रे व पोना विनोद देशमुख यांनी गुन्हयातील आरोपीचा तांत्रिक आणि गुप्त बातमीदारा मार्फत माहिती काढल्यानंतर माहे एप्रिल २०२५ मध्येच दोन्ही आरोपींपैकी महिला आरोपी मंदिपकौर ही मिळुन आली. तेव्हा पोलिसांनी मंदिपकौर हीस भा. ना.सु.स. ३५ (३) प्रमाणे नोटीस देवुन गुन्हयाचे तपासकामी हजर राहण्यासाठी समज देऊन सोडल्यानंतर महिला आरोपी मंदिपकौर हीने पुरुष आरोपी पियुष भोसले यांना पोलीस आपला शोध घेत आहे ही माहिती दिली. तेव्हा पोलीसांनी आपला पुन्हा शोध घेवु नये म्हणुन दोन्ही आरोपी पनवेल येथील त्यांचा राहते घर सोडून कोठे तरी अज्ञात ठिकाणी निघुन गेले.

दोन्ही आरोपी पोलीस ठाणेत गुन्हयाचे तपासकामी हजर राहत नाही म्हणुन पोहवा परेश म्हात्रे व पोना विनोद देशमुख यांनी आरोपीचे पनवेल येथील राहते ठिकाणी जावुन अधिक माहिती घेवुन आरोपींचा अधिक तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढली असता आरोपी हे डोंबिवली येथील प्रतिष्ठीत सोसायटी लोढा पलावा येथे राहत असल्याची माहिती प्राप्त झाली. प्राप्त बातमीबाबत पोउपनि विनोद लभडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना दिल्यानंतर त्यांनी दोन्ही आरोपींचा अधिक शोध घेण्यासाठी पोलीस पथक तयार केले. पोलीस पथकाने मानपाडा पोलीस ठाणे येथील पोलीस पथकांच्या मदतीने दोन्ही आरोपींचा लोढा पलावा, फेस २ येथील अरबानो इमारत मध्ये जावुन शोध घेतल्यानंतर दोन्ही आरोपी मिळुन आले आणि पोलीसांनी दोन्ही आरोपींना अटक करुन त्यांची पोलीस कोठडी प्राप्त केली.

पोलीसांच्या तपासात असे निष्पन्न झाले की पुरुष आरोपीसस अनेक जण पियुष भोसले सह श्रद्धानंद हरिश्चंद्र भोसले, जोएल व प्रमोद भोसले या नावाने ओळखतात. पोलीसांच्या अधिक तपासात दोन्ही आरोपींचा पनवेल शहर पोलीस ठाणेत फसवणुकीचा तर पुरुष आरोपीचा पनवेल शहर पोलीस ठाणेत एन.एम.एम. टी कर्मचारीस मारहाण प्रकरणी आणि सीबीडी, बेलापुर पोलीस ठाण्यात फसवणुकीच्या गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**नागरिकांना आवाहन**

दरम्यान, या आरोपींनी ज्यांची फसवणुक केली असल्यास त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाणेचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांनी केले आहे.

## ओवे गाव रस्त्यांलगत वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल, हरित पनवेल या संकल्पनेखाली पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आज जयकुमार सर्कल ते ओवे गावालगतच्या रस्त्यावरती अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, माजी नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल, नागरिक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



जयकुमार सर्कल ते ओवे गावालगतच्या रस्त्यावरती सर्वत्र गवताचे साम्राज्य पसरले होते, स्थानिक नागरिकांनी या ठिकाणी वृक्षारोपण करण्याबाबत पालिकेकडे मागणी केली होती. त्यानूसार या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते सुमारे ७० बहाव्याच्या झाडांचे रोपण करण्यात आले. बहाव्याच्या झाडांमुळे भविष्यात या परिसराचे सुशोभिकरणही होणार आहे. येत्या काही दिवसात उर्वरीत रस्त्याच्या कडेला सुमारे २०० झाडे महापालिकेच्या वतीने लावण्यात येणार आहे.

बदलत्या हवामानाचा परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार पनवेल महानगरपालिकेने व्यापक वृक्षारोपण मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत शहरातील विविध ठिकाणी एक लाखाहून अधिक झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. महानगरपालिकेच्या विविध उद्यान केंद्रांवरून नागरिकांना मोफत देशी वृक्षांचे रोपे उपलब्ध करून दिली जात आहेत. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केली आहे.

या वेळी खारघर प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, उद्यान विभागाचे पर्यवेक्षक नितीन राठोड, स्वच्छता निरीक्षक कुणाल गायकवाड, संदिप भोईर, अतुल मोहकर ,महापालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## लैंगिक अत्याचार करणाऱ्यास अटक

**पनवेल : वार्ताहर**

डॉक्टर तरुणीला शितपेयातून गुंगीचे औषध पाजून तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या तसेच तिचे अश्लिल व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करणाऱ्या तरुणाला खारघर पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. आनंद दादाभाऊ गते असे त्याचे नाव असून, खारघर पोलिसांनी पीडित तरुणीचा अश्लिल व्हिडीओ असलेला त्याचा मोबाईल जप्त केला आहे. आनंद गते हा पुण्यातील भिमाशंकर येथे राहणारा आहे. त्याने एप्रिलमध्ये सोशल मीडियावरून पीडित डॉक्टर तरुणीसोबत मैत्री केली होती. त्यानंतर हे दोघे खारघरमध्ये भेटले असता, त्याने पीडित तरुणीला शितपेयातून गुंगीचे औषध पाजून तिला सातारा येथील एका लॉजमध्ये नेऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला व त्याचे चित्रण त्याच्या मोबाईलमध्ये केले. त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## ई-कचऱ्यासाठी शाळेला बॉक्सचे वाटप



**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरीच्या या वर्षीच्या पर्यावरण सुरक्षा प्रकल्पाचा एक भाग म्हणुन रोटरी खारघर मिडटाऊनतर्फे खारघर येथील ग्रीन फिंगर्स शाळेत ई-कचरा गोळा करण्यासाठी बॉक्स बसावला. २५०हून अधिक विद्यार्थी, शिक्षक रोटरी सदस्य या वेळी उपस्थित होते.

ई-कचरा वेगळा काढून त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावणे कसे गरजेचे आणि महत्त्वाचे आहे हे मुलांना पटवून देण्यात आले. प्रत्येक महिन्याला हा कचरा गोळा करून तो रिसायकल करण्यासाठी पाठवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा सन्मान केला जाणार आहे तसेच पुढे जाऊन सोलर पेनल व वॉटर aerators अमलात आणण्याची योजना आहे.

या कार्यक्रमाला क्लबचे अध्यक्ष डॉ रविकिरण, डॉ कोमल गुंडेवार, ग्रीन स्कूल परियोजना अध्यक्ष भरत जैन, शाम फडणीस, जी.के. मिश्रा, डॉ. किरण कल्याणकर, नंदकुमार मेहता, विशाल अगरवाल यांच्यासह शाळेचे शिक्षक, कर्मचारी आणि २५०पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते.



**पनवेल : गुरूपौर्णिमेनिमित्त भाजप ओबीसी मोर्चा शहर अध्यक्ष सतिश पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या.**

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरूपोर्णिमा साजरी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपोर्णिमेचा उत्सव दिमाखात साजरा करण्यात आला. दरम्यान, संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नुकतेच अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यालयात वर्षभर अनेक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांची सुरुवात गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून करण्यात आली.

यानुसार विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात वक्तृत्व स्पर्धा, बुके मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी गुरुविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल मनापासून धन्यवाद दिले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून गुरुचे महत्त्व सांगितले. प्राचार्यांनी आपल्या भाषणात गुरुच्या महत्वावर प्रकाश टाकत रामशेठ साहेबांच्या सेवाभावी कार्याची आठवण करुन दिली. त्यांनी सांगितले की, यावर्षी गुरुपोर्णिमा फक्त शैक्षणिक नात्यानेच नव्हे तर सामाजिक व प्रेरणादायी नेतृत्वाचेही स्मरण करणारी ठरली.

कार्यक्रमाच्या प्रमुखपदी संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सीडीसी मेंबर दिपक शिंदे, कामगार नेते अनिल खोपडे, आदी उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात

### संचालिका वर्षा ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सी. के. टी. विद्यालयाच्या प्राथमिक विभागातील इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुपौर्णिमाचे औचित्य साधून गुरु शिष्य परंपरा जोपासत अनोखी गुरुवंदना देण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

विद्यार्थी नेहमीच आपल्या गुरुचे अनुकरण करत अनेक गोष्टी शिकत असतो. शिक्षकांबरोबरच पालकांचे संस्कार पाल्यासाठी महत्वाचे असून त्यामधून मुलांची अधिक प्रगती होत असते, असे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर यांनी यावेळी आपल्या भाषणात नमूद केले.

या वेळी मुख्याध्यापिका नलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व स्पष्ट करत आजचा हा दिवस म्हणजे गुरूप्रती आदर आणि सन्मान व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो. पुढे त्या म्हणाल्या की, गुरुमुळे आयुष्यातील अज्ञानाचा अंधःकार दूर होतो. गुरू आपल्याला योग्य मार्गदर्शन आणि दिशा देऊन आयुष्य सुखकर जगायला शिकवतो.

या वेळी गुरुप्रती आदर व्यक्त करत शाळेतील विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी राज्यस्तरीय स्वच्छता मॉनिटर अभियानात मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल वर्षा ठाकूर यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांचे कौतुक केले. दरम्यान, मास्टरमाईंड, इंग्लिश मॅरेथॉन, ऑलिम्पियाड परीक्षा तसेच महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत राष्ट्रीय पातळीवर तसेच किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप ऑल इंडिया डान्स स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवरील प्रावीण्य मिळवलेल्या विजेत्याचे कौतुक करून त्यांना गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला पालक प्रतिनिधी उपाध्यक्ष अनुराधा सुर्यवंशी, सचिव माधुरी धनावडे, मराठी माध्यम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी आदी उपस्थित होते.






पनवेल : भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचे वडील स्व. जगन्नाथ भगत आणि आई स्व. भिमाबाई जगन्नाथ भगत यांची पुण्यतिथी गुरुवारी होती. यानिमित्त अरुणशेठ भगत यांनी पुष्पहार अर्पण करून आई-वडिलांना अभिवादन केले. या वेळी रतनशेठ भगत, रमेशशेठ भगत, हुसेन इस्माईल शेख आदी उपस्थित होते.









पनवेल : भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांना पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह अनेकांनी भेट देऊन गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या, तर अरुणशेठ भगत यांनी गुरूपौर्णिमेनिमित्त श्री भगवती साई देवस्थान येथे साईबाबांना वंदन केले. या वेळी भाजप पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे आदी उपस्थित होते.







पनवेल : गुरुपौर्णिमेनिमित्त भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांना अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# संवेदनशीलतेचा अभाव

शाळकरी वयातील मुलींमध्ये मासिक पाळीविषयी असलेले अवघडलेपण, संकोच, मानसिक ताण समजून न घेता स्वच्छतागृहातील डागांमुळे त्यांची आक्षेपार्ह पद्धतीने तपासणी करणाऱ्या मुख्याध्यापिकेची टोकाची असंवेदनशीलताच समोर आली आहे. या प्रकरणात योग्य कारवाई झाल्यास पदामुळे हातात आलेल्या अधिकारांचा मनमानी पद्धतीने नव्हे तर जबाबदारीने वापर करायला हवा हे शिक्षण क्षेत्रातील संबंधितांना कळण्यास मदत होईल.

**शहापूरच्या नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत स्वच्छतागृहात रक्ताचे डाग आढळल्याने मुख्याध्यापिकेने 'कुणाची मासिक पाळी सुरू आहे' हे शोधण्यासाठी पाचवी ते दहावीच्या अनेक विद्यार्थिनींची गणवेश काढून तपासणी केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे शाळेत पाण्याचा अभाव असल्याने मुलींनी भिंतीला पुसलेल्या रक्ताच्या डागांकरिता मुख्याध्यापिकेला मुलींना फैलावर घ्यावेसे वाटले. या अनपेक्षित कठोर झडतीने भेदरलेल्या विद्यार्थिनींनी पालकांना घडला प्रकार सांगितल्यावर संतापलेल्या पालकांनी शाळेत आणि नंतर पोलिस ठाण्यात धाव घेतली. शाळेत स्वच्छता राखण्याकरिता विद्यार्थ्यांना नियम आखून देणे, शिस्तीने ते पाळले जातील हे पाहणे, नियम मोडणाऱ्यांना प्रसंगी शिक्षा करणे हा मुख्याध्यापिकेच्या कामाचा भाग आहे हे मान्य केले तरी शहापूरमधील घटनेत मुख्याध्यापिकेने कमालीची असंवेदनशीलता दाखवली आहे रक्ताचे डाग पाहून संतापलेल्या मुख्याध्यापिकेने शाळेतील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थिनींना सभागृहात पाचारण करून प्रोजेक्टरवरून डागांची छायाचित्रे विद्यार्थिनींना दाखवली. कुणाची पाळी सुरू आहे याची संतप्त मुख्याध्यापिकेने विचारणा केल्यावर स्वाभाविकच मुली गप्प राहिल्या. त्यावर महिला मदतनीसाच्या मदतीने गणवेश उतरवून मुख्याध्यापिकेने मुलींची तपासणी केली. पाळी सुरू असलेल्या मुलींना बाजूला उभे केले आणि त्यांच्या बोटांचे ठसे घेतले. हा सगळाच प्रकार मुलींसाठी किती भेदरवून टाकणारा असू शकतो याची सहज जाणीव होते. परंतु या मुख्याध्यापिकेमध्ये आवश्यक संवेदनशीलतेचा अभाव दिसतो. शाळकरी वयात पाळीविषयी मुलींमध्ये कमालीचे अवघडलेपण असते. शारीरिक वेदना व मानसिक अस्वस्थताही प्रौढ स्त्रियांपेक्षा अधिक असते. अकस्मात सुरू होणाऱ्या पाळीची दहशतच असते. डाग पडून आपली सगळ्यांदेखत फजिती होईल याचा कमालीचा ताण विद्यार्थिनींना असतो. एखादी मैत्रीण वा आई यांच्या पलीकडे मुली याबद्दल बोलू शकत नाहीत. हे सारे समजून घेऊन शाळेतील मुलींना धीर देण्याचे, या दिवसांत सांभाळून घेण्याचे, त्यांच्या मनातील संकोच दूर करण्याचे काम खरे तर शिक्षिकांनी व मुख्याध्यापिकेने करायला हवे. स्त्री असल्यामुळे त्यांच्याकडे या टप्प्यातून गेल्याचा अनुभवही असतो. त्यामुळे हे सहज जमायलाही हवे. पण त्यासाठी गरज असते संवेदनशीलतेची. नेमका याच संवेदनशीलतेचा अभाव संबंधित मुख्याध्यापिका व इतरांमध्ये दिसतो आहे. विद्यार्थी आपल्या ताब्यात आहेत व आपल्या हाती शाळेच्या प्रमुखपदाचे अधिकार आहेत म्हटल्यावर आपण शिस्तीच्या नावावर त्यांच्याशी वाट्टेल तसे वागू शकतो असा काही जणांचा समज झालेला दिसतो. मुख्याध्यापिका वा शिक्षकांकडून वाट्टेल त्या कठोर शिक्षा व मानसिक छळ अशाच चुकीच्या धारणेतून होताना दिसतात. अन्यथा मायेची पाखर घालणाऱ्या शिक्षकांना विद्यार्थी आजन्म विसरत नाहीत. पोलिसांनी या प्रकरणात दोन विश्वस्त, मुख्याध्यापिका, चार शिक्षिका आणि मदतनीस अशा आठ जणांविरोधात पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी योग्य कारवाई झाल्यास शिक्षण क्षेत्रात संबंधितांना शिस्त आणि शिक्षेची मर्यादा कळण्यास मदत होईल.**

# सागरी सुरक्षा व्यवस्था सक्षम करण्याची गरज





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यातील मुरूड तालुक्यातील कोर्लई समुद्रकिनारी संशयित बोट आल्याचा संदेश दिल्लीहून तटरक्षक दलाने रायगड पोलीसांना दिला. त्यामुळे रायगड पोलीसांसह सर्व यंत्रणा सतर्क झाल्या. बोटीचा शोध घेण्यात आला. बोट सापडली नाही. सर्व तपासांनत ही बोट नव्हती तर तो मच्छीमारांनी जाळ्याला लावलेला बोया होता असे सिध्द झाले . त्यामुळे सर्वांनीच सुटकेचा निःस्वास टाकला. हे सार असल तरी रायगडधील आणि एकूणच सागरी सुरकक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेच आला आहे. असे प्रकार होण्याची रायगडमधील ही पहिलीच घटना नाही. तरी देखील अशा प्रकरणांकडे दर्लक्ष केल जातयं. सागरी सुरक्षा वार्यवार सोडली आहे का ? असा प्रश्न विचारला जातोय. मागील काही वर्षांत रायगडच्या सागरी किनार्यावरील घडामोडी पाहता रायगड पोलीस दल सागरी सुरक्षेच्या दृष्टीने अधिक सक्षम करण्याची गरज आहे.

मुरुड तालुक्यातील कोर्लई किल्ल्यातील दिपगृहापासून सुमारे अडीच ते तीन सागरी मैल अंतरावर पाकिस्तानी बोट मकदार बोया ९९ संशयास्पद रित्या वावरत असल्याचा संदेश दिल्लीतील तटरक्षक दलाच्या मुख्यालयातून रायगड पोलीस प्रशासनाला प्राप्त झाला. यानंतर रायगड जिल्ह्यातील सुरक्षा यंत्रणा कामाला लागल्या. रायगड पोलीस, तटरक्षक दल, मेरीटाईम बोर्ड, महसूल विभागाच्या यंत्रणानी थेरोंडा, कोर्लई परिसरात धाव घेतली. बोटीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र ही बोट कुठेच आढळून आली नाही. पोलीसांनी मुरुडसह अलिबाग परिसरात १९ ठिकाणी नाकाबंदी करत संशयित व्यक्तींचा शोध सुरू केला. बॉम्ब शोधक पथक, सशस्त्र पोलीस दल तैनात करण्यात आले. सर्व लॅण्डीग पॉईंट्सची तपासणी करण्यात आली. हॉटेल्स, लॉजेस, होम स्टे यांची कसून तपासणी करण्यात आली. निर्मनुष्य ठिकाणी शोध मोहीम राबविण्यात आली. ५२ पोलीस अधिकारी ५५४ कर्मचारी रात्रदिवस तपासकामावर लावण्यात आले. रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी रात्री थेरोंडा येथे जाऊन मच्छीमार आणि स्थानिकांशी संवाद साधत विचारणा केली. सकाळी पुन्हा एकदा बोटीबद्दल ग्रामस्थांकडे विचारणा केली मात्र थेरोंडा परिसरात कुठलीही परदेशी बोट आली नसल्याचे स्थानिकांनी सांगीतले. कोकणचे पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनीही रेवदंडा आणि थेरोंडा येथे पहाणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

संशयित बोटीच्या शोधासाठी तटरक्षक दल, नौदलाच्या नौका आणि हेलिकॉप्टरची च्या मदत घेण्यात आली. मत्स्यव्यवसाय विभागाकडून किनारपट्टीवरील भाग पिंजून काढण्यात आला. मात्र बोटीचा शोध लागला नाही. त्यामुळे संशयीत बोटीचे गूढ वाढले होते. मात्र तटरक्षक दलाच्या रडारवर दिसलेली ती पाकिस्तानी बोट नसून, तो मासेमारी जाळी बुडू नये यासाठी वापरण्यात येणारा जिपीएस ट्रॅकर असलेला बोया असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणासह स्थानीकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. यातून सागरी सुरेक्षेबाबात आपण दक्ष रहायला हवे हे सिध्द झाले आहे. १९९३ मध्येग मुंबईत झालेल्यो साखळी बॉम्बशस्फोसटासाठी वापरण्यात आलेले आरडीएक्सप श्रीवर्धनच्याईच शेखाडी किनारी उतरवण्याशत आले होते. वर्षभरापूर्वी याच महिन्यात हरिहरेश्वर किनार्यावर शस्त्रा स्त्रींनी भरलेली बोट लागली होती. त्यांनंतर चरसचा साठा सापडला. त्यामुळे सारगरी सुरक्षेच्या दृष्टीने रायगड समुद्रकिनारा किती महत्वाचा आहे ले लक्षात घ्याला हवे.

मुबईवर झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर सागरी सुरक्षेला महत्व देण्यात आले. देशात सागरी सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने प्रयत्न सुरू केले. देशातील सागरीरी किनारा लाभलेल्या नऊ राज्यांकडून सागरी सुरेक्षसंदर्भात काय केले जाते. त्यांना कोणत्या समस्या जाणवतात याची माहिती घेण्यास सुरू केली . ही महिती घेण्याची जबाबदारी इंस्टिटूट ऑफ डिफेन्स स्टडी अ‍ॅण्ड अ‍ॅनालिसेसचे (आयडीएसए) यांच्यावर सोपविण्यात आली. सगरी सुरक्षेसाठी पोलीस, नौदल, तटरक्षक दल, मरीटाइमबोर्ड, मच्छिमार यांचा सभाग असतो. त्यांना कोणत्या समस्या जाणवात . त्यांच्या समन्वय असण्यासाठी कोणत्या उपाय योजना कराव्या लागतील याची माहिती घेण्यात आली. त्यांनतर जिल्ह्यात मांडवा, दादर आणि दिघी येथे सागरी पोलीस ठाणे उभारण्यात आली. समुद्रात गस्त घालण्यासाठी पोलीसांना नौका देण्यात आल्या. सध्या रायगड पोलीसांकडे एकूण ९ सागरी गस्ती नौका आहेत. त्यापैकी केवळ चार नौका कार्यरत आहेत. दोन नौकांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. बंद करण्यात आल्या आहेत म्हणजे त्या वापरण्यायोग्य नाहीत तर आणखी एक बोटीची नोंदणी रद्द करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील १२० किलोमीटर लांबीच्या किनारपटटीवर गस्त घालण्यसाठी केवळ चार नौका आहेत. या नौका लहान आहेत. त्ययामुळे खोल समुद्रात जाताना मार्यादा येतात. खराब हवामानात त्यांचा टिकाव लागत नाही. त्यामुळे पावसाळयातील चार महिने रायगड पोलीसांची सागरी किनार्यावरील गस्त बंद असते. याचा गैरफायदा घतला जाऊ शकतो. त्यामुळे पोलीसांना चांगल्या प्रतीच्या नौका द्यायला हव्यात. सांगरी सुरक्षेचया दृष्टीने रायगड पोलीस दलाकडे अत्याधुनिक बोटी असणे आवश्यक आहे. मागील काही वर्षांत रायगडच्या किनार्यांवरील घडामोडी पाहता रायगड पोलीस दल सागरी सुरक्षेच्या दृष्टीने अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. सागरी सुरक्षा ही नौदल आणि तटरक्षक दल याचीं जबाबदारी आहे. जमीनीवर पोलीसांची जबाबदारी येते. या तीनही विभागत समन्वय असला पाहिजे.

केवळ सागरी पोलीस ठोण उभारून किंवा किनार्यावर गस्त घालण्यासाठी नौक देऊन सागरी सुरक्षा सक्षम होणार नाही. त्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्रदी द्यावी लागेल. ज्या ठिकाणी मच्छीमार बोटी येतात त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावले पाहिजेत. इतरही काही लँडिंग पॉईंट आहेत तेथे देखील सीसीटीव्ही कॅमेरे लावले पाहिजे. त्या ठिकाणी पोलीस चौक्या उभारल्या पाहिजे. सागरी सुक्षेकडे दुर्लक्ष नको. सागरी सुरक्षा व्यवस्था अत्याधुनिक साधनांनी आधिक सक्षम करयाला हवी.

## बदलते तंत्रज्ञान

# मारुती कंपनीची नवीन डिझायर कार लाँच

मारुती कंपनीने लाँच केलेल्या या नव्या डिझायरने अनेक भन्नाट फिचर्स देण्यात आले आहे.देशाची सर्वात मोठी कार निर्माता कंपनी मारुती सुझुकीने मोठ्या प्रतिक्षेनंतर आपली सर्वात सेफेस्ट कार मारुती डीझायर फोर्थ जनरेशन मॉडेलला विक्रीसाठी लाँच केले आहे. या कारमध्ये अनेक नवीन फिचर्स देण्यात आले आहे. आकर्षक लुक सोबत दमदार फिचर्सच्या या सेडान कारची सुरुवातीची किंमत ६.७९ लाख रुपये ( एक्स–शोरूम) असणार आहे. या कारला सनरुफचे फिचर्स देण्यात आले असून सात रंगात ही कार उपलब्ध असणार आहे.




नवीन मारुती डिझायरला चार वेरिएंट्स LXi, VXi, ZXi, आणि ZXi Plus मध्ये लाँच केलेले आहे.ही कार गॅलेंट रेड, अल्लुरिंग ब्ल्यू, नटमेग ब्राऊन, ब्लुईश ब्लॅक, आर्कटिक व्हाईट, मॅग्मा ग्रे आणि स्प्लेंडिड सिल्व्हर सह सात रंगात उपलब्ध आहे. या कारची बुकींग सुरु झाली आहे. केवळ ११,००० रुपयांत ही कार बुक करता येते.

या कारच्या लुक आणि डीझाईनमध्ये अनेक बदल केलेले आहे. आधी कॉर्नरवर राऊंड शेप पाहायला मिळायचा आणि त्याला शार्प केलेले आहे. नवीन फ्रंट ग्रिल, रेक्टेंगुलर आणि शार्प एलईडी हेड लँप, नव्या डिझाईनचे फॉग लॅम्प हाऊजिंग, चंकी ग्लॉस ब्लॅक ट्रीमने कारला आणखीन आकर्षक बनविले आहे.

नवीन डिझायर कारच्या पाठी मागील टेल लँपमध्ये वाय शेपची एलडीई लायटींग केली आडे. टेलगेटवर क्रोम स्ट्रीप दिली असून जी दोन्ही टोकाना जोडताना दिसत आहे. टॉप मॉडेलमध्ये डायमंड कट एलॉय व्हील देण्यात आले आहे. शार्प स्टायलिंग एलिमेंट्समुळे कारचे सध्याचे मॉडेल आधीच्या तुलनेत जास्त चांगले दिसत आहे.क्रॅश टेस्टमध्ये ५ स्टार रेटींग मिळणारी मारुती सुझुकी कंपनीची ही पहिली कार आहे. नवीन मारुती डिझायरचा केबिन आधीच्या मॉडेलच्या तुलनेत खूपच प्रिमियम आहे. यात सनरुफ, ९ इंचाचा इन्फोटेंमेंट सिस्टीम, रियर सेंटर आर्मरेस्ट, ऑटोमेटिक एसी, रियर एसी वेंट्स सारखे फिचर्स दिलेले आहेत. केबिनच्या जागेत स्पेस देण्याचा प्रयत्न केला आहे. दरवाजात बॉटल होल्डर, मागच्या सिटवर सेंटर आर्मरेस्टसह कप होल्डर दिला आहे.

# प्रसिद्ध गीतकार शांताराम नांदगावकर



**निमित्त**

'हृदयी वसंत फुलताना' यांसारखी सतत ओठावर खिळणारी गाणी देऊन रसिकांना उत्साहात ठेवणारे गीतकार म्हणून कवी शांताराम नांदगावकर यांची ओळख होती. सहज आणि सुंदर शब्दांची गुंफण असणाऱ्या आणि मनाचा ठाव घेणारी गीते देणारे ज्येष्ठ गीतकार शांताराम नांदगावकर हे मूळचे कोकणातील नांदगावचे. त्यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९३६चा, तर शालेय शिक्षण दादरच्या शिरोडकर हायस्कूलमध्ये झाले. आज त्यांचा स्मृतिदिन...

'पाहिले न मी तुला', 'प्रथम तुला वंदितो', 'ही नव्हे चांदणी', 'दाटून कंठ येतो', आदी त्यांची गीते विशेष गाजली. अष्टविनायक,'नवरी मिळे नवऱ्याला', 'बनवा बनवी', पैजेचा विडा आदी मराठी तसेच हिंदी चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केले होते. श्रोत्यांच्या ओठावर खेळतील अशा सहजसुंदर काव्यरचना हे त्यांचे वैशिष्ट्य होते. चित्रपटगीतांबरोबरच बालगीते, भावगीते व लोकगीतेही आणि भक्तीगीतेही लिहिली. 'ससा तो ससा' हे बालगीत आजही मुलांना वेड लावते.

शब्दांमधून जग आणि जगाची रीत उभी करण्याची मोठी ताकद त्यांच्यात होती, परंतु दुर्दैवाने त्यांच्या बहराचा काळ हा मराठी चित्रपट गीत–संगीताच्या दृष्टीने अधोगतीचा होता. त्यामुळे अनेकदा 'बिनडोक' सिच्युएशन्ससाठी गाणी लिहिण्याचे 'व्यावसायिक काम' त्यांना करावे लागले. तरीही जेव्हा केव्हा संधी मिळाली तेव्हा तेव्हा त्यांनी गीतकार म्हणून आपल्या क्षमतेचा प्रत्यय आणून दिला. गीतकार म्हणून त्यांचा प्रवास भावगीताच्या प्रांतात सुरू झाला, तेव्हा चित्रपटसृष्टीत ग.दि., सुधीर फडके, राम कदम, जगदीश खेबुडकर ही समीकरणे ऐन भरात होती.

यानंतरच्या पंधरा वर्षांत सर्व काही बदलले. या दरम्यान नांदगावकर यांनी भावगीतांच्या प्रांतात मुशाफिरी केली. 'रामप्रहरी राम गाथा'सारखे त्यांचे गाणे पूर्वसूरींशी आणि मराठी भक्तीगीतांच्या सुरेल परंपरेशी नाते सांगणारे होते. १९८०नंतरचा जवळपास दोन दशके मराठी चित्रपट उथळ पाण्यात गटांगळ्या खात होता. नांदगावकर नेमके याच काळात गीतकार म्हणून वावरत होते. १९७९ साली 'अष्टविनायक' या चित्रपटात गाणी लिहून ते खऱ्या अर्थाने 'मेन स्ट्रिम'मध्ये आले, परंतु त्यांनी चित्रपटाबाहेर जशी गाणी लिहिली, उदाहरणार्थ, 'सजल नयन नितधार बरसती', 'रुपेरी वाळूत माडांच्या बनात' तशी त्यांना चित्रपटात लिहिण्याची संधी क्वचितच मिळाली.

संगीतकार अनिल–अरुणसोबत त्यांची 'वेव्हलेंग्थ' चांगलीच जुळली, 'गंमत जंमत'साठी किशोरकुमार यांना मराठी गाणे द्यायचे ठरले, तेव्हा मराठीतल्या 'ळ'चा उच्चार करता येत नाही आणि 'च'चा उच्चार आपण 'च्य' असा हिंदी पद्धतीने करतो, असे कारण सांगून ते गाण्यासाठी राजी होईनात, पण ही अडचण आव्हान म्हणून स्वीकारत नांदगावकर यांनी, 'प्रिये, जगू कसा तुझ्याविना मी राणी गं' अशी सोपी शब्दरचना केली आणि किशोर कुमार यांनी धमाल उडवून दिली. गाणं अतिशय लोकप्रिय झाले.

शांताराम नांदगावकर १९८५मध्ये विधान परिषदेवर निवडून गेले होते. त्यांचे ११ जुलै २००९ रोजी निधन झाले.

**–संजीव वेलणकर**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# तुळशीचे पाणी पिण्याचे अमृतासमान फायदे

प्राचीन काळापासून एक पवित्र वनस्पती म्हणून दारी राहणाऱ्या तुळशीला विशेष मान आहे. तुळशीचे औषधी गुणधर्मसुद्धा अनेक आहेत. अगदी रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापासून ते श्वसनाच्या समस्या सोडवण्यापर्यंत अनेक प्रश्नावर तुळशीचे सेवन हे रामबाण उपाय ठरते.



तुळशीला डप्टोजेन मानले जाते, याचा अर्थ तुळस शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास आणि संतुलन राखण्यास मदत करते. तुळशीमध्ये इम्युनोमोडचुलेटरी गुणधर्मदेखील असतात, याचा अर्थ ते शरीराची रोगप्रतिकारक प्रतिक्रिया वाढवू शकते. हे गुणधर्म संक्रमण आणि आजारांपासून लढण्यास मदत करू शकतात.

### तणावावर नियंत्रण

तुळशीचे पाणी शरीराला शांत करू शकते, अंतर्गत हालचालींची लय संतुलित राहते. त्यामुळे ज्यांची जीवनशैली फार तणावग्रस्त आहे त्यांनी दिवसातून एकदा हे तुळशीचे पाणी प्यायल्यास फायदा होऊ शकतो.

### पचनाला मदत

तुळशीमध्ये कार्मिनेटिव गुणधर्म असतात जे गॅस आणि सूज कमी करण्यास मदत करू शकतात. काही अभ्यासांमध्ये असेही सुचवले आहे. यामुळे आतड्याचे कार्य सुधारू शकते, पचनास मदत होते.

### श्वसनासाठी मदत

वर्षानुवर्षे तुळशीच्या पानांचा वापर खोकला, सर्दी आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या दूर करण्यासाठी केला जात आहे. तुळशीमध्ये कफनाशक गुणधर्म असतात, कफ बाहेर टाकण्यास आणि रक्त साचून गुठळ्या होण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत करतात. तुळशीचे दाहकविरोधी गुणधर्म घसा खवखवणे किंवा जळजळणाऱ्या श्वसननलिकेस शांत करू शकतात.

### अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस

तुळशीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल्ससारखे विविध अँटिऑक्सिडंट्स असतात. हे अँटिऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानाशी लढण्यास मदत करतात. तुळशीच्या पाण्याचे सेवन केल्याने शरीराला आवश्यक अँटिऑक्सिडंट्सचा पुरवठा वाढू शकतो ज्यामुळे अनेक आजारांपासून संरक्षण मिळू शकते. याविषयी अजून सविस्तर संशोधन होण्याची गरज आहे.

# तीन वाहनांचा विचित्र अपघात

## मोटरसायकलचालक गंभीर जखमी



**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत-कल्याण या राज्य मार्गावरील नेरळ परिसरात तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे. आय ट्वेन्टी या कार चालकाने विरुद्ध दिशेला जाणाऱ्या एका चार चाकी वाहनाला धडक देऊन त्यामागून येणाऱ्या मोटरसायकल चालकाला समोरून धडकले आहे. यामध्ये कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी मोटरसायकलवरील चालक प्रल्हाद कनोजिया हा गंभीर जखमी झाला व तीन वाहनांचे मोठे नुकसान झाले.

कर्जत तालुक्यातील कडाव येथे राहणारे ज्ञानेश्वर गुरव हे आपली आय ट्वेन्टी कार घेऊन नेरळ येथे निघाले होते. दरम्यान कर्जत कल्याण राज्य मार्गावरील शार्विल या शाळेच्या परिसरात रस्त्याची एकेरी वाहतूक सुरू होते त्या ठिकाणी त्यांचे वाहनावरील ताबा सुटल्याने कार समोरून येणाऱ्या अल्टो कारला धडकली. ही धडक एवढी भीषण होती की अल्टो कार ४५ अंशाच्या कोणात रस्त्यावर फिरली. यानंतर गुरव यांनी मागून येणाऱ्या मोटरसायल चालकाला समोरून धडक दिली.मोटरसायकल चालक प्रल्हाद कनोजिया थेट चारचाकी वाहनाच्या काचेवर जाऊन कोसळले.डोक्याला जबर दुखापत त्यांना प्रथम नेरळ खांडा येथील डॉक्टर शेवाळे त्यानंतर अधिक उपचारासाठी रायगड हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.

या विचित्र अपघातात अल्टो कार, मोटारसायक आणि आय ट्वेन्टी कारचे मोठे नुकसान झालेले आहे. अल्टो कार मालक शंकर त्रिपाठी हे आपल्या एक वर्षाच्या नातवाला घेऊन कुटुंबासोबत कर्जत येथे निघाले होते. मोटरसायकल चालक प्रल्हाद कनोजिया हे आपल्या मुलांना शाळेत घेण्यासाठी जात होते. कपडे इस्त्रीचे व्यवसाय करणारे प्रल्हाद यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.



**अलिबाग : गुरुपौर्णिमेनिमित्त ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री, महाराष्ट्र भूषण श्री.आप्पासाहेब धर्माधिकारी, सचिनदादा धर्मधिकारी यांची रेवदंडा निवासस्थानी भारतीय जनता पक्ष अलिबाग दक्षिण तालुका मंडळ ज्येष्ठ नेते हेमंत दांडेकर, अशोक वारगे, राजेंद्रकुमार वाडकर, गजानन पाटील, ज्ञानेश्वर टिवळेकर, सतीश हाले, गजानन झेंडेकर यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.**

# १५ शासकीय आरोग्य संस्थांना कायाकल्प पुरस्कार



**माणगाव : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या वतीने कायाकल्प पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. त्यात रायगड जिल्ह्याच्या आरोग्य विभागाने वेगळी छाप उमटवत.' कायाकल्प ' योजनेत भरारी घेतली आहे. जिल्ह्यातील १५ प्राथमिक आरोग्य केंद्र व २९ आरोग्यवर्धिनी उपकेंद्र अशा सुमारे ४४ शासकीय आरोग्य संस्थांना कायाकल्प पुरस्कार जाहीर झाला आहे.

कायाकल्प ही एक लोकाभिमुख व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा सुनिश्चित करणारी योजना आहे. ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांना सक्षम, स्वच्छ, विश्वासार्ह व रुग्णाभिमुख बनवण्याचे प्रभावी पाऊल आहे. केंद्र आणि राज्यशासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२४-२५ या वर्षातील ' कायाकल्प ' पुरस्काराची घोषणा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.

जिल्हास्तरावरील प्रथम क्रमांकाचा दोन लाख रुपयांचा पुरस्कार माणगाव तालुक्यातील निजामपूर प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळाला आहे. आरोग्य सेवा सुधारणेच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या 'कायाकल्प' उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सन २०२४-२५ मध्ये रायगड जिल्ह्यातील एकूण १५ प्राथमिक आरोग्य केंद्रांना व २९ उपकेंद्रांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे. ही बाब जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे व जनतेच्या आरोग्यावरील सकारात्मक परिणामाचे प्रतीक मानली जात आहे.

यामध्ये माणगाव तालुक्यातील खरवली उपकेंद्र यांना प्रथम पारितोषिक रक्कम रुपये १ लाख व उपकेंद्र शेळटोली ता. महाड या आरोग्य संस्थेस रक्कम रुपये ५० हजार, उपकेंद्र सुग्वे ता. कर्जत या आरोग्य संस्थेस रक्कम रुपये ३५ हजार व उर्वरित उपकेंद्रांना प्रोत्साहन पर रक्कम रुपये २५ हजार चे पारितोषिक मिळाले आहे.

# राजिप तळाघर शाळेत साहित्य वाटप कार्यक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

राजिप तळाघर शाळेतील इयत्ता १ली ते ३री या वर्गांतील एकूण २० विद्यार्थ्यांना शालेय भेट वस्तू (शालेय बॅग इत्यादी) प्रदान करण्यात आल्या.

या उपक्रमासाठी क्लारेंट एम्प्लॉइज युनियन, अर्कोमा, सुदर्शन रोहा यांच्या सौजन्याने आणि कृष्णा कळंबे (सरचिटणीस, क्लारेंट एम्प्लॉइज युनियन) यांच्या विशेष प्रयत्नाने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमास युनियनचे जनरल सेक्रेटरी संजयजी पोकळे, उपाध्यक्ष सचिन मोरे, उपाध्यक्ष सागर जांबेकर, खजिनदार प्रविण मोरे, सरचिटणीस तेजस माळी यांची उपस्थिती लाभली.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेशजी कांबळे, सदस्य रूपेशजी शिंदे, देवजी जाईलकर, मंगेश शिंदे, उपाध्यक्षा सौ. शर्मिलाताई कांबळे व शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते तर क्लारेंट एम्प्लॉइज युनियन, रोहाचे शाळा परिवाराच्या वतीने आभार मानण्यात आले.




**विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**

नोंदणी क्रमांक: एन. बी. ओ.एम/सिडको/एच एस जी/(टीसी)/१०३०५/डी.आर/सन २०२४-२५

भुखंड क्र. ०४. बिल्डींग नं. १३ ते २२, सेक्टर १८, नवीन पनवेल (पूर्व), नवी मुंबई-४१०२०६.

**TENDER NOTICE**

Sealed Tenders / Offers are invited by Vikas Co-op Housing Society, Plot No. 4, Sector 18, New Panvel - 410206 for proposed redevelopment in lieu of rights to sell the additional flats from Builders / Developers of repute.

The Tender document can be collected from the PMC Office Urban Analysts and Solution Consultancy Services, A-1307, Plot No. 18/19, Sector 15, C.B.D Belapur (Contact Name - Ar. Neha Raut - 8803228888) From the date 11/07/2025 to 24/07/2025 (Both dates included) Between 10:00 a.m. to 06:00 p.m.

Payment of Rs. 20,000/- (Non-refundable) by Demand Draft in favor of Vikas Co-operative Housing Society Ltd., Plot No. 4, Sector 18, New Panvel, Navi Mumbai-410206.

Sealed Tender bids shall be submitted in the manner prescribed in the instructions to tenderers as mentioned in Tender Document on or before 31/07/2025 by 6:00 at the PMC Office.

The society reserves the right to reject any or all bids without assigning any reason.

**Date:- 10/07/2025**
**Place: New Panvel**

सही/- अध्यक्ष | सही/- सचिव | सही/- खजिनदार

विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित


# विकसित महाराष्ट्र २०४७ सर्वेक्षणात नागरिकांनी मत नोंदवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**



विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी विविध १६ क्षेत्र निहाय नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राधान्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत विकसित भारत -भारत २०४७ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन जाहिर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र / करारनामा)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे इरादापत्र दिले असून **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र हे.आर. | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १ | उलवे ८८३ | सोनखार ७ | १०/४<br>१०/२५<br>१२/२६ | ०-५-१<br>०-१६-७<br>०-१०-२ | ३०० चौ.मी. | नोड उलवे येथील भूखंड क्र.२५३, सेक्टर-१९, क्षेत्र -२९६.२४ चौ.मी. | गोपाळ अंबाजी पाटील(मयत) कै ठकूबाई हरी मढवी उर्फ ठकूबाई लक्ष्मण म्हात्रे (मयत) कै गंगूबाई गंगाराम ठाकूर (मयत) यांचे वारस १.श्रीमती पार्वतीबाई गोपाल पाटील २. श्री प्रल्हाद गोपाळ पाटील ३. श्री कपिलमुनी गोपाळ पाटील ४. श्रीमती वत्सला गजानन ठाकूर ५.श्रीमती सुनेत्रा सुरेश तारे ६.श्री बाळकृष्ण गंगाराम ठाकूर | निरंक |
| २ | उलवे ८९४ | उलवे १५१<br>उलवे १५१ | ४९/०<br>३८/०<br>४१/५<br>४३/६<br>४५/४ | ०-६-०<br>०-३७-०<br>०-२५-०<br>०-१२-१<br>०-१७-० | ४०० चौ.मी.<br>व<br>४५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.७७A, सेक्टर-१०B, क्षेत्र-८५० चौ.मी. | कै. गोकूळ उर्फ गोकूळया पदया उर्फ पद्दया पाटील (मयत), कै.काळया पदया पाटील (मयत), कै. तुकाराम कृष्णा पाटील (मयत), कै. हिराबाई उर्फ निराबाई लिकूर कोळी (मयत), कै. नर्मदाबाई दत्तात्रेय उर्फ दत्तू कोळी (मयत), कै. बारक्या पदया पाटील (मयत), कै. रामा पदया पाटील (मयत) व कै. चांगूबाई रामा पाटील यांचे वारस व हक्कसोडपत्रान्वये लाभार्थी भुधारक १) श्रीमती राधाबाई कृष्णा कोळी, २) श्री. जनार्दन नारायण कोळी, ३) श्री. कमळाकर नारायण कोळी, ४) श्री. सुधाकर नारायण कोळी, ५) श्री. बाळकृष्ण नारायण कोळी, ६) श्री. चिंतामण दत्तू कोळी, ७) श्री. बाळाराम बारक्या पाटील, ८) श्री. गजानन बारक्या पाटील, ९) श्रीमती श्रावणी कृष्णा पाटील, १०) श्रीमती चंद्राबाई काशीनाथ कोळी, ११) श्रीमती मालूबाई बारक्या पाटील उर्फ शर्मिला रमेश पाटील | -- |
| ३ | उलवे १२०१ | उलवे २५३+१५६A | ७१/५A | ०-६९-० | ६०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.३१, सेक्टर-२१, क्षेत्र-५९९.९८ चौ.मी. | कै. बबन बुधाजी मढवी उर्फ पाटील (मयत) यांचे वारस १) श्री. लक्ष्मण बबन पाटील उर्फ मढवी, २) श्रीमती आशा जगन्नाथ पाटील उर्फ मढवी, ३) श्री. सचिन जगन्नाथ पाटील उर्फ मढवी, ४) श्री. अमोल जगन्नाथ पाटील उर्फ मढवी, ५) श्री. प्रदिप जगन्नाथ पाटील उर्फ मढवी व ६) श्रीमती कमला मदन म्हसकर | -- |
| ४ | रोडपाली १८३ | ११९ | १६+१७ ते २९+१३० ते १४१+१४७/४३८/२८५ | ०-३८-४ | ३५० चौ.मी. | भूखंड क्र.७८, सेक्टर-१६ई, क्षेत्र-३५० चौ.मी. रोडपाली नोड | कै. नामदेव विठु पालेकर (मयत) यांचे वारस १) उंदीर नामदेव पालेकर २) कृष्णा नामदेव पालेकर ३) बाबा नामदेव पालेकर (मयत) यांचे वारस ३.१) फशीबाई बामा पालेकर, ३.२) समीत बामा पालेकर | निरंक |
| ५<br>६ | रोडपाली १४४ | ३अ/१०<br>५५ | १२१/६<br>४३७/१३५<br>४३७/१७५<br>४३७/१८३ | ०-२१-०<br>०-१९-०<br>०-०५-०<br>०-१२-१ | **५०० चौ.मी.** | **भूखंड क्र. १३अ, सेक्टर- १६ई, क्षेत्र ४४७.८० चौ.मी. रोडपाली नोड** | **कै. गोमा गण्या पाटील (मयत)** यांचे वारस श्री. रामदास गोमा पाटील (मयत) यांचे वारस १.१) श्रीमती. पार्वती रामदास पाटील, १.२) श्री. अरुण रामदास पाटील व १.३) श्री. राम रामदास पाटील व २) कै. चंद्रकांत गोमा पाटील(मयत) यांचे वारस २.१) श्रीमती सुमती चंद्रकांत पाटील, २. २) श्री. विलास चंद्रकांत पाटील व २.३) श्री. महादेव चंद्रकांत पाटील | निरंक |


उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्धी झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१५६/२०२५-२६

# शेवाळ साचल्याने पदपथ निसरडे



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईत पावसामुळे पदपथांची दुरवस्था झालेली पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी पदपथांवरील काही ठिकाणी हिरवळ येऊन पदपथ निसरडे झाले आहेत. त्यामुळे तिथून चालताना मोठी कसरत करावी लागत असून घसरून अपघातही होऊ लागले आहेत. त्यामुळे किमान या पदपथांची स्वच्छता करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

नवी मुंबई शहरातील नेरुळसह अनेक ठिकाणी पावसामुळे हिरवळ येऊन पदपथ निसरडे झाले आहेत. त्यामुळे अनेकजण या पदपथावरून चालताना घसरून पडत आहेत. त्यात शाळेच्या बाहेरील पदपथ देखील निसरडे झाल्याने विध्यार्थ्यां देखील पडत असल्याच्या घटना घडत आहेत.

ज्या ठिकाणी बाजारपेठ, दुकाने, नागरी वस्ती मोठ्या प्रमाणत आहे. त्या ठिकाणी नागरिक ये-जा करण्यासाठी पदपथांचा वापर मोठ्या प्रमाणात करतात; परंतु मनपा प्रशासनाकडे मागणी करूनही निसरडे झालेल्या पदपथावर उपाययोजना केली जात नाही.

यामुळे पदपथावर घसरून जखमी होण्याच्या घटना नवी मुंबईत नियमित होत असून मनपा प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

**नेरूळ विभागातील विविध रस्त्यांच्या दुतर्फा पदपथांची निर्मिती करण्यात आली असून आता सुरू असलेल्या पावसाळ्याच्या दिवसात पावसाने पदपथावर शेवाळ निर्माण झाले आहे. यामुळे जेष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी,महिला यांचा तोल जाऊन दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनपा प्रशासनाने त्वरित उपाययोजना करावी.**

**-स्वप्नील घोल, अध्यक्ष, नेरूळ रहिवासी संघ**

**नवी मुंबई मनपा कार्यक्षेत्रात पावसामुळे पदपथावर निर्माण झालेल्या शेवाळ्यावर ब्लिचिंग पावडर टाकण्याचे काम सुरु आहे. त्यानंतर जेटिंग मशीनच्याद्वारे पदपथ पूर्ववत केले जाईल.**

**-अजय गडदे, घनकचरा व्यवस्थापन, उपायुक्त, नवी मुंबई मनपा**

# प्रभावी वक्तृत्व शैली महत्त्वाची गुरूकल्ली -मयुरेश नेतकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी प्रभावी वक्तृत्व शैली ही एक अत्यंत महत्त्वाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन भाजपचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी केले.

महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशन आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या वर्ग अंतर्गत फेऱ्या सुरू आहेत. त्या अनुषंगाने स्पर्धा प्रमुख म्हणून मनोगत व्यक्त करताना म्हंटले.

ते पुढे म्हणाले की, वत्कृत्वशैली हा शब्द फक्त बोलणे किंवा भाषण देणे इतकाच मर्यादित नाही. हा शब्द आहे व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावशाली अभिव्यक्तीचा. भविष्य उज्ज्वल करायचे असेल, तर विचारांइतकीच त्यांची मांडणीही प्रभावी असली पाहिजे. राजकारण असो, व्यवसाय असो, शिक्षण असो किंवा कोणतंही क्षेत्र वकृत्व हेच यशाचं द्वार उघडण्याचं साधन आहे. वक्तृत्व म्हणजे केवळ मोठ्या शब्दांत भाषण देणं नव्हे, तर समोरच्याच्या मनाला स्पर्श करणं, त्यांच्या भावना समजून घेऊन संवाद साधणं हाच खरा संवादाचा आत्मा असतो. आज आपण पाहतो की नेतृत्व हे प्रभावी संवादातून जन्म घेतं. उत्तम वक्ता हा केवळ श्रोत्यांचं लक्ष वेधून घेत नाही, तर त्यांच्या मनात विचारांची ठिणगीही पेटवतो. त्यामुळे शालेय जीवनापासून वक्तृत्वाची आवड निर्माण होणे गरजेचे आहे, आणि ते काम कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका करत आहे, असेही मयुरेश यांनी अधोरेखित केले.

# गुळसुंदे येथे आज मोफत नेत्र तपासणी शिबिर

**रसायनी : प्रतिनिधी**

डॉ सुहास हळदीपुरकर यांचे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल आणि भारतीय जनता पक्ष गुळसुंदे गाव यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर शुक्रवारी (दि.११) आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व अल्पदरात चष्मे देण्यात येणार आहेत. तरी गुळसुंदे, लाडीवली, आकुलवाडी, आदीवासी वाडी परिसरातील गरजू व गरीब नागरिकांनी याचा लाभ घ्यावा.

समाज मंदिर, गुळसुंदे अंगणवाडी समोर हे शिबिर सकाळी ९.३० ते ३ या वेळेत होणार आहे. सर्व ग्रामस्थ मंडळ गुळसुंदे, सर्व सदस्य पोलिस पाटील आशा वर्कर्स अंगणवाडी सेविका यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा कार्यकर्ते यांनी केले आहे

अधिक माहितीसाठी गुळसुंदे ग्रामपंचायत सदस्य मनोज पवार (७३८७३३२७५३), विनोद पाचघरे (९५९४९८६८१८) यांच्याशी संपर्क साधावा. ज्या पेशंटला मोतीबिंदू आहे अशा पेशंटने रेशनकार्ड व आधारकार्डची झेरॉक्स हॉस्पिटलमध्ये येताना मोबाईल नंबर सोबत आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : श्री.रामशेठ ठाकूर सामाजित विकास मंडळाच्या वतीने महापालिकेच्या शाळा क्रमांक ४ कोळेश्वर विद्यामंदिर शाळेत मोफत वह्यांचे वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यासोबत गुरूपौर्णिमेनिमित्त पूजन करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर व भाजप ओबीसी सेल तालुकाध्यक्ष कविता पाटील यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन-नियोजन मुख्याध्यापक दशरथ म्हात्रे, दर्शना भगत, चंद्रकांत वारगुढे, प्रियांका सोनजे, सुहास ठोंबरे, प्राची पाटील यांनी केले होते.**



**पनवेल : भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी उरण तालुक्याचे माजी अध्यक्ष रवि भोईर यांची निवड झाली आहे. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन रवि भोईर यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, सीमा घरत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

# प्रधानमंत्री पीकविमा योजनेबाबत कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक जिल्हा नियोजन भवन येथे खरिप हंगाम २०२५ मधील राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या भितीपत्रकाचे अनावरण झाल्यापासून १ ते ३१ जुलै २०२५पर्यंत पीकविमा काढण्यासाठी सुरुवात झालेली आहे.

त्यासाठी पीकविमा हे कृषी ऑफिस, स्थानिक बँका, सीएससी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, शेतकरी यांना भेटी देऊन जास्तीत जास्त या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.



पनवेल तालुक्यात विविध ठिकाणी पीकविमा योजनेबाबतची कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी तालुका कृषी अधिकारी शरद भास्कर गिते, जिल्हा व्यवस्थापक पुरुषोत्तम सरनाईक, तालुका व्यवस्थापक अनिल तांडेल आदी उपस्थित होते.

यावर्षी महाराष्ट्र शासनातर्फे पीकविमा योजनेमध्ये अत्यंत चांगले बदल करण्यात आले असून ते शेतकऱ्यांच्या हिताचे आहेत. शेतकऱ्यांनी काही शंका असल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पनवेल येथे भेट द्यावी, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

दरम्यान, पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक, कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळातील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसानभरपाई मिळणार आहे.

# उर्दू प्राथमिक शाळेत वह्यांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेलतर्फे आज येथील पनवेल महापालिकेच्या पीर करम अली शाह उर्दू प्राथमिक शाळा क्र. १० मध्ये शालेय वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक मुकिद काझी, माजी नगरसेविका सुरेखा मोहोकर, जैनब शेख तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका नाझिया दळवी, केंद्र समन्वयक अशफाक काझी, मिनाझ पित्तू, पठाण अब्दुल गफ्फार, नल्लामंदु सिराज, फरहत जहाँ, सबा तांबोळी यांच्यासह भाजप ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा संयोजक प्रसाद हनुमंते, शहर उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई, सचिन नाझरे, राज चव्हाण, नरेंद्र सोनवणे, सुधीर देसाई आदी उपस्थित होते.



# द्रोणागिरी हायस्कूलमध्ये ग्रंथ, वृक्ष दिंडी

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूल करंजा या विद्यालयात आषाढी एकादशी ग्रंथ दिंडी व वृक्ष दिंडी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिवशी शाळेमध्ये विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सा. म्हात्रे एस. सी. मॅडम, सर्व शिक्षक वर्ग, सर्व माता पालक संघ सदस्य व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी करंजा ग्रुप ग्रामपंचायतचे विद्यमान सरपंच अजय म्हात्रे उपस्थित होते. विठ्ठल रखुमाई व श्री सार्थ ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचे वेश परिधान करून दिंडी मिरवणूक काढली.



# येत्या सोमवारी लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार १४ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोंकण विभागाच्या अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) राजलक्ष्मी शाह यांनी कळविले आहे.

# सीकेटी विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल. येथे गुरुवारी (दि.१०) गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी विद्यालयाची माजी विद्यार्थिनी डॉक्टर निकिता वसंत मोकल, माजी शिक्षिका युगंधरा हर्डीकर मॅडम, चिरंजीव पुनीत मोकल, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे (इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग) अजित सोनवणे सर (पर्यवेक्षक उच्च माध्यमिक विभाग) यांची उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ईशस्थवन व गुरुस्तवन बोलून कार्यक्रमाची सुरुवात केली. मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी प्रमुख अतिथींचे शाल, श्रीफळ व बुके देऊन स्वागत केले. विभाग प्रमुख व पालक प्रतिनिधींचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विद्यालयातील शिक्षकांना भेटवस्तू देऊन आशीर्वाद घेतले.

कार्यक्रमांमध्ये विद्यालयात झालेल्या स्पर्धांचे पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना देण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गुरु शिष्यांची गोष्ट सांगितली इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी छान असे नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

डॉ. निकिता मोकल यांनी आपल्या मनोवतामध्ये शाळेतील शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव यांनी आभार मानले.

# फुंडे विद्यालयात गुरूपौर्णिमा साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य साळुंखे बी.बी.यांच्या अध्यक्षतेखाली गुरुपौर्णिमा साजरी झाली.

प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख पाटील एच.एन.यांनी केले. त्यानंतर विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी.बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस.एम. बाबर व एस.एस. पाटील, नितीन म्हात्रे व उपस्थित सर्व गुरुजनांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी विद्यालयातील आदर्श व गुणी विद्यार्थिनी राधिका खामकर हिला आठवी शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल तिचा सन्मान करण्यात आला.

सोहळ्याचे नियोजन इ.१० वी कच्या वर्गाने व वर्गशिक्षिका जितेकर के.एम.यांनी केले. सूत्रसंचालन परीनिती भोईर व आभार साक्षी मेटकरी हिने मानले.



# गव्हाण विद्यालयाची गुरूकुल प्रकल्प अंतर्गत क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मधील गुरुकुल प्रकल्पांतर्गत इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी उलवे नोड,नवी मुंबई येथील प्रसिद्ध 'जिओ इन्स्टिट्यूट'ला क्षेत्रभेट दिली.



या वेळी या संस्थेतील कृत्रिम बुद्धिमत्ता, मार्केटिंग व स्पोर्टस् मॅनेजमेंट आदी पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे अत्याधुनिक डिजिटल स्मार्ट वर्ग, सुसज्ज ग्रंथालय,संगणक कक्ष,ए.आय.स्टुडिओ, व्यायाम शाळा,त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या धावपटुंसाठी उपलब्ध असलेले सिंथेटिक मैदान व स्टेडियम ह्या सर्व बाबी पाहून विद्यालयाचे विद्यार्थी स्तंभित होवून अक्षरशः हरखून गेले. ऑलिंपिक स्पर्धांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व केलेले धावपटू तसेच आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक प्राप्त अनेक धावपटूंनी याच मैदानावरती सराव केला व अन्य सराव करीत आहेत.

जिओ इन्स्टिट्यूट चे प्रशासकीय अधिकारी विनोद माने, संदीप सावंत व इतर सहकारी कर्मचाऱ्यांनी उपक्रमांची दालने व अनुशंगीक बाबींची माहिती दिली.

मयुरी शिंदे यांनी इन्स्टिट्यूट विषयी अत्यंत अभ्यासपूर्ण माहिती सांगितली.

विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व ज्येष्ठ शिक्षक सागरकुमार रंधवे यांच्या विशेष प्रयत्नातून आयोजित करण्यात आलेल्या या क्षेत्र भेटीमध्ये विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर,ज्येष्ठ शिक्षिका चारुशीला ठाकूर,नववी व दहावी या दोन्ही गुरुकुल वर्गाचे वर्गशिक्षक अनुक्रमे गीतांजली म्हात्रे व सागर रंधवे आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी अत्यंत उत्साहाने सहभागी झाले.

अंबानी कुटुंबियांच्या वतीने उलवे नोड येथे जिओ इन्स्टिट्युटची स्थापना करण्यात आली असून स्थानिक धावपटू व खेळाडूंना देखील इथे प्रोत्साहित करण्यात येत असल्याचे प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून समजले.

## निवडक

### वरसे येथे रक्तदान शिबिर

**रोहे :** खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वरसे ग्रामपंचायतीच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे शासकीय रक्तपेढी अलिबाग यांच्या साह्याने आयोजन करण्यात आले आहे यांची सुरुवात वरसे ग्रामपंचायत सभागृह येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सरपंच रामाशेठ म्हात्रे, उपसरपंच मयुरी पडवळ, शासकीय रक्तपेढीचे डॉ दिपक गोसावी, ग्रामसेवक विजय अहीरे, दत्तात्रेय सावंत, सदस्य नरेश पाटील, अमित मोहीते, शांतीशील तांबे, डॉ स्वप्नाली पाटील, मिनल देशमुख, राम नाकती, गौरव सुर्वे, उतेश कांबळे, जितेंद्र पडवळ, रविंद्र देवरे, महेश देशमुख, दुर्गेश नाडकर्णी, संजय पाटील, सरीता पालांडे, ज्योती थळे, नितीन भोईर आदी उपस्थित होते.

### दारूबंदीसाठी पोलिसांना निवेदन

**चौक :** खालापूर नगर पंचायत हद्दीतील दांडवाडी येथे दारू बंदीसाठी आज महीला मंडळ यांनी निवेदन दिले. खालापूर तालुक्यातील खालापूर नगर पंचायत हद्दीतील दांडवाडी येथे अवैद्य दारू विक्री होते, असा आरोप तेथील महिला मंडळ यांनी केला असून, दारू विक्रेते यांच्यापासून स्थानिक ग्रामस्थ यांना त्रास होत आहे. त्यामुळे गावातील शांतता भंग होत असते. काम, नोकरी, व्यवसाय करणारे सामान्य नागरिक येथे शांततेत राहत आहे,कधीच सामाजिक सलोखा राखण्यास मदत होत आहे, पण अवैद्य दारू विक्री करणारे यांच्यापासून त्रास होत असल्याचा आरोप महिला मंडळ यांनी करून खालापूर पोलिस यांना निवेदन दिले.

### आदेश डफळ यांची नियुक्ती

**मुरूड :** तालुक्यासाठी नवनिर्वाचित तहसीलदार म्हणून शासनातर्फे आदेश डफळ  यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी मुरुड तालुक्याचा पदभार नुकताच स्वीकारला आहे. या वेळी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करताना मुरूड तालुका  बांधकाम कामगार सेना अध्यक्ष दिनेश मिनमिने, शिवसेनेचे युवा नेते  दीपेश वरणकर, तेलवडे उपसरपंच निलेश तांबटकर, माजी सभापती किशोर धामणस्कर माजी सभापती चंद्रकांत मोहिते, ठेकेदार सागर कांबळे, शिवसेना शाखाप्रमुख नितेश पाटील आदी उपस्थित होते.



# श्रीवर्धन तालुक्यात भात लावणीची कामे रखडली

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मागील पंधरा दिवसांपासून श्रीवर्धन तालुक्यात पावसाने मारली दडी, उखारु भात शेतीतील भात लावणीची कामे रखडली आहेत.

यावर्षी पावसाला लवकरच सुरुवात झाली, पण हवामान खात्याने हा पाऊस अवकाळी असल्याचे जाहीर केले होते. प्रत्यक्षात पाहता हा पाऊस मोसमी पाऊसच सुरू झाला होता. कारण त्यावेळी समुद्राचे पाणी देखील खवळलेले होते व जोरदार वारे देखील सुटत होते. सुरुवातीच्या पावसाचे हेच लक्षण असते. विजांच्या कडकडाटासह ढगांचा गडगडाट होणे, म्हणजे पहिला पाऊस सुरू झाला असे मानले जाते.



कारण यावर्षीचे सर्व सण जवळजवळ महिनाभर अगोदर आले आहेत. या वेळी गणेशोत्सवदेखील ऑगस्ट महिन्यात होत असून नवरात्र सप्टेंबर महिन्यात आहे. दिवाळी ऑक्टोबर महिन्यात साजरी केली जाणार आहे. सुरुवातीला श्रीवर्धन तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे सर्वत्र पाण्याची पातळी वाढली व विहिरीला देखील पाणी जमिनीच्या लेव्हलपर्यंत आले. तर नद्या नाले देखील दुथडी भरुन वाहू लागले.

पावसाने लवकर सुरुवात केल्यामुळे स्वाभाविक शेतकऱ्यांनी आपली भात पेरणी देखील या वेळेला लवकर केली. आता भात लावणी योग्य झालेले असून अनेक उखारु शेतांमध्ये पाणी नसल्यामुळे लावणीची कामे रखडलेली आहेत. तर पाणथळ शेतांमध्ये देखील पाण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. उखारु शेतीची भात लावणी करण्यासाठी जोरदार पाऊस सुरू असावा लागतो व ओढ्याचे येणारे पाणी शेतात आल्यानंतर त्यामध्ये चिखल तयार होतो व भाताची लावणी करता येते. मागील महिन्याभरापासून श्रीवर्धन समुद्रकिनारी जोरदार वारे सुटत असून पावसाचे आलेले ढग पुढे सरकतात.

श्रीवर्धन पासून दहा ते पंधरा किलोमीटर लांब म्हसळ्याच्या जवळ गेल्यानंतर पाऊस पडताना दिसतो. परंतु श्रीवर्धन कोरडेच असते. आता सुद्धा दिवसातून दहा मिनिटं एखाद पावसाची सर कोसळते व एरवी लख्ख सूर्यप्रकाश पडलेला असतो.

### शेतकरी चिंतातूर

**जर येत्या पाच-सहा दिवसात जोरदार पाऊस झाला नाही तर भात शेतीची लावणी न झाल्याने भाताची रोपे खूप मोठी होतील. उशिरा लावणी झाल्यानंतर सदरची पिके वाढण्यासाठी खूप उशीरदेखील होतो. एकूणच पावसाने दडी मारल्यामुळे या ठिकाणचा शेतकरी चिंतातूर झाल्याचे पाहायला मिळत आहे.**

# मार्गावर पडलेली खडी तरुणांनी बाजूला केली

**खालापूर : प्रतिनिधी**

हाळ फाटा ते पळसधरी मार्गे कर्जत ला जाणाऱ्या मार्गांवर अंजरूण गावाजवळ बांधकामांसाठी लागणारी खडी लांबलचक १०० मिटर पर्यंत डम्पर मधून खडी पडून रस्ता धोकादायक झाला होता. या घटनेने वाहने घसरुन अपघात होण्याची शक्यता लक्षात परीसरातील तरुणांनी अंगमेहनतीने बाजूला केली अन्यथा अंधारात वाहने घसरुन अपघात होण्याची दाट शक्यता होती. चारचाकी वाहन चालक सांभाळून चालवत होते मात्र दुचाकीस्वार चार जण घसरून खाली पडले.



अंजरुंग गावातील भावेश रसाळ, किशोर लाले, नरेश रसाळ, भाऊ सणस व किरण हडप याभागातील सामाजिक कार्यकर्त्यांनी रस्ता मोकळा करून दिला. खडी मशीन चालक व डम्पर  मालक चालवाल्याला तंबी देत कारवाई करण्याची मागणी केली जात आहे., माणकिवली, नावंढे केळवलीचे अनेक ग्रामस्थ, हेल्प फौंडेशन चे हनीफ कर्जिकर, अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा फवारा मारुन खडी बाजूला केल्यानंतर, खोपोली फायर ब्रिगेड यांच्या सहकार्याने रस्त्यावरील खडी एका बाजूला करुन रस्ता वाहतुकीस मोकळा करण्यात आला.

खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, खोपोली नगरपालिकेचे उपमुख्य अधिकारी रणजीत पवार, खोपोली अग्निशमन दलाचे मोहन मोरे आणि इतर कर्मचारी त्याच सोबत वाहतूक पोलीस यंत्रणा यांनी तातडीने निर्णय घेऊन योग्य उपाययोजना केल्या.

हनीफ कर्जीकर, मेहबूब जमादार, किरण हाडप, सचिन कर्णूक, गौरव दिसले इतर सामाजिक कार्यकर्त्यांनी मोलाची मदत केल्याने मोठी आपत्ती टळली.

### आरसीएफ नोकरभरतीच्या परीक्षेसाठी मार्गदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलाइज़र्स लिमिटेड (आरसीएफ) या भारत सरकारच्या सार्वजनिक उपक्रमात कर्मचारी भरतीसाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात येते. यासाठी ऑनलाइन अर्ज केलेल्या रायगड जिल्ह्याचे रहिवासी असणार्या उमेदवारांना मार्गदर्शन लाभावे यादृष्टीने 'भरतीपूर्व जागरूकता कार्यक्रम ११ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ ते संध्या. ४ या दरम्यान समृद्धी सभागृह, प्रशासकीय इमारत प्रवेशद्वार, आरसीएफ कारखाना - थळ युनिट, ता-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती आरसीफ थळचे मानव संसाधन उप महाप्रबंधक प्रशांत पाटील यांनी दिली.

भरती संबंधीत मार्गदर्शन सत्राचे वेळापत्रक उमेदवारांना त्यांनी ऑनलाइन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर कळविण्यात आले आहे. संबंधित उमेदवारांनी सदरच्या ई-मेल ची प्रत (हार्ड किंवा सॉफ्ट कॉपी) तसेच आधार कार्ड (प्राधान्याने)/पॅन कार्ड/ड्रायविंग लायसेन्स ची छायाप्रत सोबत घेऊन त्यांना नेमून दिलेल्या वेळेत समृद्धी सभागृह, प्रशासकीय इमारत प्रवेशद्वार, आरसीएफ कारखाना - थळ युनिट, ता-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे उपस्थित रहावे आणि मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशांत पाटील यांनी केले आहे.

## वावंढळ येथे सिकल सेल जनजागृती मेळावा

**चौक : प्रतिनिधी**

सिकलसेल निमिया हा सिकलसेल रोगाचा सर्वात गंभीर प्रकार आहे, एक अनुवांशिक रक्त विकार आहे. सिकल सेल निमियामध्ये अनुवांशिक उत्परिवर्तन वारसाने येतो, ज्यामुळे असामान्य सी आकाराच्या किंवा सिकल आकाराच्या लाल रक्तपेशी निर्माण होतात. या पेशींना सिकल सेल म्हटल जात, असे खालापूर कर्जत समन्वयक रेखा देवरे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद शाळा वावंढळ येथे आरोग्य विभागामार्फत सिकलसेल आजाराविषयी जनजागृती कार्यक्रम ग्राम महसूल अधिकारी उदयसिंह देशमुख यांनी आयोजित केला होता. त्यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमांमध्ये आरोग्य सेविका यांनी सिकल सेल आजाराविषयी माहिती, त्याची कारणे व त्याबाबत घ्यावयाची काळजी याबाबत उपयुक्त माहिती दिली. सिकल सेल आजाराविषयी असलेल्या अज्ञानामुळे जीवित हानी होण्याची समस्या उद्भवू शकते हा आजार अनुवंशिक असल्यामुळे त्याचे त्याच्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याची मत प्रकट करण्यात आले. वेळेत उपचार घेतल्यास पुढील धोका टळू शकतो याविषयी योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी पत्रकार अर्जुन कदम, वावंढळ मुख्याध्यापिका योगिता पाटील, सर्व शिक्षक, ग्रामसेविका मंगल केदारे, आरोग्य विभागाच्या आरोग्य सेविका तसेच आशा सेविका व ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.





नागोठणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांना वाढदिवसानिमित्त नागोठणे विभागीय नेतागण नरेंद्र जैन, डॉ. राजेंद्र धात्रक, रिचा राजेंद्र धात्रक, प्रकाश जैन, अनिल काळे, मंगेश तेरडे आदींनी शुभेच्छा दिल्या.

## कर्जत पोलीस ठाण्याच्या निरीक्षकपदी संदीप भोसले



**कर्जत :** पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांची अलिबाग येथे बदली झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर संदीप भोसले यांची नियुक्ती झाली आहे. भोसले हे यापूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यात कार्यरत होते. गरड यांचा निरोप व भोसले यांच्या स्वागत समारंभाच्या वेळी गरड यांनी, माझ्या वीस वर्षांच्या कारकिर्दीत कर्जत पोलीस ठाण्यात केलेली सेवा खडतर होती, मात्र या सेवेतून मला खूप काही शिकता आले, असे स्पष्ट केले. याप्रसंगी पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी गिरवले भात लागवडीचे धडे

**माणगाव : प्रतिनिधी**

अनुभवातून प्रत्यक्ष शिक्षण देणाऱ्या छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयात प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण दिले जाते. याच दृष्टीने सोमवार दि.७ जुलै २०२५ रोजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भात लागवड कशी करावी याचे प्रशिक्षण देण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे  यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता आठवी ते दहावीतील सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक यांनी चरई बुद्रुक गावातील शेतकरी संतोष नामदेव काप यांच्या शेतात दुपारी जाऊन श्र भाताची लागवड कशी करावी याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्यक्ष भात लागवड कशी करतात हे त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करून घेण्यात आले.शेतकरी व त्यांचे कुटुंब यांनी याकामी मोलाचे सहकार्य केले. पॉवर टेलर याच्या साह्याने भात लागवडीसाठी चिखल कसा करावा याचे ज्ञान देण्यात आले.


या सर्व उपक्रमात शाळेचे शिक्षक दीपक गुजर , गावित, अमोल तोडकरी यांनी मुलांबरोबर भातलागवडीचा  मुलांबरोबर आनंद घेतला. प्रत्यक्ष शेतावर जाऊन शेती लागवड कशी करावी, शेतीची कामे कशी करावी याबाबतचे अनुभव मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला असून पालकांनी तसेच शिक्षणप्रेमींनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.



# पावसामुळे ग्रामीण भागातील निसर्ग खुलला

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाचे अगमन झाले की,सर्वत्र ठिकाणी चैतन्य निर्माण होत असते. कारण पाऊस मनाला खूप आनंद देत असतो. यामूळे पावसाचे अगमन झाले की धरती आपली जुनी कात टाकून नविन साज चढवित असते. धरती जणू हिरवा शुंगार करुन सजली आहे की काय? असा भास  जाणवू लागला आहे.



पावसाचे येणं म्हणजे या धरतीने हिरवा शाळू परिधान करण असंच काही असतं म्हणूनंच अनेकांना या सृष्टीची भुरळ पडली जात असते. डोंगराच्या दरी खो-यातून वाहणारे फेसाळलेले धबधबे मानवी मनाला आनंद देत असताना, पक्ष्यांचे थवे त्यांचा मंजूळ ध्वनी मानवी मनाला सुखद अनुभव देत असतात. सर्वकडे जणू चैतन्य निर्माण झालेले आहे.

माळरानावर आदिवासी बांधवानी भाजीपाल्यांची लागवड सुरु केली असल्यामुळे माळरान जसे हिरवळ निर्माण झाली आहे. तालुक्यांच्या ठीकानी माळरान हे भाज्या मूळे हिरवे गार झाले आहे.त्याच बरोबर सध्या शेतात ही लागवड सुरु आहे यामूळे सर्वत्र धरती जणू या हिरव्या रंगांची उधळण करीत आहे की काय असा भास अनुभवला मिळत आहे. डोंगरदऱ्ची हिरवळ पाहण्यासाठी वीकेंडला कर्जत, खोपोली, लोणावळा, खंडाळा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होत असते. धबधब्याखाली भिजण्याचा आनंद घेणाऱ्या बच्चे कंपनीला पाहून मोठ्यानाही मोहआवरत नाही. एकंदरीत हवा हवासा वाटणारा मान्सून केव्हा केव्हा उग्ररूप धारण करतो तेव्हा मात्र तो नकोसा होतो.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

अवधूत साठे ट्रेडिंग अकॅडमीच्या सीएसआर निधी तून कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दहा शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. अकॅडमीच्या माध्यमातून अनेक शाळांना आवश्यकतेनुसार मदत केली जाते.

कर्जतच्या माजी नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या प्रयत्नातून अवधूत साठे ट्रेडिंग अकॅडमीच्या सीएसआर निधीतून जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांना आवश्यकतेनुसार मदत केली जाते. मागील वर्षी सुमारे हजार विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले होते. तसेच टाकवे येथील शाळेत लादी बसवून देण्यात आली. जय अंबे भवानी भिसेगाव शाळेसाठी पाण्याची सोय व्हावी म्हणून पाईपलाईन टाकून दिली. तंत्रज्ञानाची ओळख व्हावी. यासाठी काही शाळांना कम्प्युटर सिस्टीम, लॅपटॉप  देण्यात आले होते. यावर्षी मुलांना पावसाळी स्पर्धा आणि मैदानी खेळ खेळता यावे या दृष्टीने २० शाळांना क्रीडा गणवेश वाटप करण्यात आले.



जांभिवली केंद्रातील जिल्हा परिषद शाळा- वेणगाव खुर्द, वेणगाव बुद्रुक, वदप, कुशिवली, जांभिवली, डोणेवाडी, अरवंद, साळोख, बारणे, भोईरवाडी या शाळांना क्रीडा गणवेश अवधूत ट्रेडिंग अकॅडमीच्या गौरी साठे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी कर्जतच्या माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, ज्ञानेश्वर वाडीले, श्रीकृष्ण सुपे, अजय डाळिंबकर, भगवान घरत, माधवी कोसमकर, प्रणिता निकम, संजय देशमुख, वनिता चंद्रावले, संदेश भोईर आदी उपस्थित होते.

# लॉर्ड्स मैदानावर भारत-इंग्लंड द्वंद्व

**लॉर्ड्स : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीतील तिसरा कसोटी सामना लंडनमधील लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळला जात आहे. मालिकेत सध्या १-१ अशी बरोबरी आहे. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला.

तत्पूर्वी भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेला आता अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी असे नाव देण्यात आले आहे. हे नाव सचिन तेंडुलकर आणि इंग्लंडचा अनुभवी गोलंदाज जेम्स अँडरसन यांच्या सन्मानार्थ देण्यात आले आहे. सचिन तिसऱ्या कसोटीच्या आधी मैदानात उपस्थित होता आणि त्याने खास पाहुणा म्हणून लॉर्ड्सच्या घंटानादाची परंपरा पार बजावली. त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.




लॉर्ड्सच्या मैदानावर घंटानाद करणे हा मोठा सन्मान मानला जातो. हे मैदान क्रिकेटची पंढरी म्हणून ओळखले जाते. सर्वाधिक १४५ कसोटी सामन्यांच्या आयोजनाचा मान लॉर्ड्सला मिळाला आहे. येथे पॅव्हेलियनच्या लगतच ही घंटा ठेवण्यात आली आहे. दरवर्षी जेव्हा या मैदानावर कसोटी सामना होतो तेव्हा एका खास पाहुण्याकडून घंटानाद केला जातो. सामना सुरू होण्याची औपचारिक सुरुवातीची घोषणादेखील मानली जाते. गेल्या अनेक दशकांपासून ही परंपरा सुरू आहे.

कसोटी मालिकेत दोन्ही संघ आतापर्यंत बरोबरीत आहेत. पहिला सामना इंग्लंडने, तर दुसरा सामना भारतीय संघाने जिंकला. त्यामुळे ही कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. तिसरा कसोटी सामना दोन्ही संघांसाठी महत्त्वाचा आहे. दरम्यान, जसप्रीत बुमराम भारतीय संघात परतला आहे.

सामन्याच्या पहिल्या सत्राच्या पहिल्या तासाच्या खेळात इंग्लिश सलामी जोडीने भारतीय वेगवान मारा खेळून काढला. त्यांनी विकेट पडू दिली नाही, पण त्यानंतरच्या पहिल्या षटकात भारताने जबरदस्त कमबॅक केले. १३.३व्या षटकात नितीश कुमार रेड्डीने प्रथम बेन डकेटला लेग-साईडच्या दिशेने जाणाऱ्या चेंडूवर बाद करून सलामीची भागीदारी फोडली. त्यानंतर त्याच षटकाच्या शेवटच्या सहाव्या चेंडूवर त्याने एका अप्रतिम चेंडूवर झॅक क्रॉलीला तंबूत धाडत भारताला सामन्यात झटपट आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ओली पोप आणि जो रूट यांनी डाव सांभाळला.

## जे.जे. पाटील यांना कबड्डीचा श्रमयोगी कार्यकर्ता पुरस्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये रायगडचे जे.जे. पाटील यांना रमेश देवाडीकर श्रमयोगी कार्यकर्ता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनतर्फे दरवर्षी कबड्डीमहर्षी स्व. बुवा साळवी यांचा जन्मदिन (१५ जुलै) हा कबड्डी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यंदा रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने २५वा कबड्डी दिन पोयनाड येथील जय मंगल कार्यालयात साजरा करण्यात येणार आहे.

## मुरूडच्या नूतन विद्यालयातील दोघींचे कराटे ब्लॅक बेल्ट परीक्षेत यश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथील दोन शालेय विद्यार्थिनींनी कराटे स्पर्धेच्या परीक्षेत यश प्राप्त केले आहे. रेश्मा मंगेश भोईर (इयत्ता आठवी) आणि काव्या केतन नाक्ती (इयत्ता नववी) असे या विद्यार्थिनींची नावे आहेत.

बॅल्क बेल्ट मिळाल्याबद्दल सहजीवन विद्या मंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत, शिक्षक प्रतिनिधी भारत चव्हाण, निशा बिरवाडकर, नियती ठमके, शिल्पा कळके, राहिल घलटे, सागर राऊत, वरिष्ठ लिपीक मंगेश नांदगावकर, भारती बांद्रे, रिंकल तिडके, प्रीतम शेडगे आदींच्या उपस्थितीत रेश्मा आणि काव्या यांना सन्मानित करण्यात आले. या दोघींना क्योशी तांबडकर व रेन्शी अभिषेक तांबडकर यांचे मार्गदर्शन लाभले.





































**पनवेल : गुरूपौर्णिमा गुरुवारी सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांना अनेक मान्यवरांनी भेट देऊन गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. सोबत उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते. दरम्यान, अरुणशेठ भगत यांची भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी निवड झाल्याबद्दलही त्यांचे सर्वांनी अभिनंदन केले.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com